CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०५.०८.२०२६ | अंक नं. १०८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

IGI सर्टीफाईड डायमंड ज्वेलरी आता आपल्या बजेटमध्ये !
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ १११/-*
Conditions Apply*

# महापालिकेच्या पथकाने हटविली बाजारपेठेतील अतिक्रमणे

## कापड बाजारातील रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू होणार; पुन्हा अतिक्रमणे केल्यास गुन्हे दाखल करण्याचा इशारा

नगर - शहरातील कापड बाजारातील मुख्य रस्त्याच्या सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरू करण्यासाठी रस्त्यावरील सर्व अतिक्रमणे हटविण्याची मोठी मोहीम महापालिकेच्या पथकाद्वारे ५ ऑगस्ट रोजी राबविण्यात आली. या मोहिमेत कापड बाजार, घास गल्ली आणि मोची गल्ली परिसरातील अतिक्रमणे हटवण्यात आली आहेत.

कापड बाजार, मोची गल्ली, घास गल्ली येथे अनेक विक्रेते रस्त्यावरच हातगाड्या लावून व्यवसाय करीत आहेत. तसेच काही दुकानदार रस्त्यावर साहित्य ठेवतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होतो. तसेच कापड बाजारातील मुख्य रस्ता मोठ्या प्रमाणात उखडला आहे. या रस्त्याचे काम महापालिकेच्यावतीने हाती घेण्यात आले. सर्जेपुराकडून या रस्त्याचे काम सुरु असून, छबुराव लांडगे चौकापर्यंत हे काम प्रगतीपथावर आहे. आता छबुराव लांडगे चौकापासून भिंगारवाला चौकापर्यंतच्या रस्त्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. मात्र, तत्पूर्वी या रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे आवश्यक असल्याने महापालिकेच्या पथकाने ५ ऑगस्ट रोजी ही अतिक्रमण हटाव मोहिम राबविली.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिक्रमण विभागप्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे यांच्या पथकाने ही अतिक्रमण हटाव मोहीम यशस्वीरीत्या पार पाडली. या कारवाईदरम्यान रस्त्यावरील अनधिकृत हातगाड्या आणि रस्त्यावर अडथळा ठरणारे साहित्य हटविण्यात आले असून, यामुळे आता सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे.

या रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात आल्यानंतर पुन्हा अतिक्रमण केल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील. तसेच जप्त केलेले साहित्य परत मिळणार नाही, असा इशारा यावेळी महापालिकेच्या पथकाने दिला आहे.



कापड बाजार परिसरातील रस्त्यांवरील हातगाड्या व अतिक्रमण हटविताना महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकातील कर्मचारी. (छाया : धनेश कटारिया)

# मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

## सुरक्षेच्या साधनांविनाच करताहेत साफसफाई; प्रशासनाचे दुर्लक्ष

नगर - शहरातील विविध भागांत स्वच्छता राखण्याचे महत्त्वपूर्ण काम करणाऱ्या सफाई आणि घनकचरा उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य महापालिकेच्या दुर्लक्षामुळे धोक्यात आलेले आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत केंद्र शासनाच्या आणि विविध समित्यांच्या मार्गदर्शक सूचना महापालिकेकडून पायदळी तुडवून कर्मचाऱ्यांच्या हक्कांची अवहेलना होत आहे. हे कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून कचरा उचलण्याचे काम करत असले, तरी काम करताना त्यांना महापालिकेकडून हातात घालण्यासाठी ग्लोज, मास्क किंवा वैयक्तिक सुरक्षा साहित्य मिळत नाही.

स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुरक्षित रहावे तसेच इतर कोणत्याही इजांपासून त्यांचे संरक्षण व्हावे, यासाठी शासनाकडून विविध मार्गदर्शक सुचना स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आलेल्या आहेत. त्यांनुसार मनपाने स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे गरजेचे असताना कोणतेही सुरक्षा साधने न वापरताच हे कर्मचारी हाताने कचरा उचलताना दिसून येत आहेत. सुरक्षा साहित्याअभावी काम केल्यामुळे या कर्मचाऱ्यांना त्वचेचे आजार, दमा, अस्थमा यांसारख्या अनेक गंभीर आजारांचा सामना करावा लागू शकतो. मात्र, या गंभीर बाबीकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षा साधनांवर खर्च करण्यासाठी महापालिकेला आवश्यक तरतूद करण्याच्या सूचना आहेत. संबंधित ठेकेदार स्वच्छता कर्मचाऱ्यांना जर सुरक्षा साधने प्रदान करीत नसेल तर त्याच्यावर कारवाईचे अधिकारही महापालिकेला प्रदान करण्यात आलेले आहेत. असे असतानाही महापालिका जाणिवपूर्वक कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकडे आणि त्यांना सुरक्षा साधने पुरविण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

स्वच्छता कर्मचाऱ्यांची दरमहा आरोग्य तपासणी करण्याचेही निर्देश आहेत. मात्र, महापालिका कधीही कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करीत नाही. तसेच सुरक्षा साधनेदेखील पुरविली जात नाहीत. कर्मचाऱ्यांचे आरोग्य निरोगी राहावे आणि त्यांना आरोग्याची हानी पोहचू नये, यासाठी महानगरपालिका आणि संबंधित ठेकेदाराने स्वच्छता व घंटागाडी कर्मचाऱ्यांना तातडीने आवश्यक सुरक्षा साहित्य पुरवावे, अशी मागणी नागरिक व कर्मचाऱ्यांकडून जोर धरत आहे. महानगरपालिका आयुक्त आणि कचरा विभागाच्या प्रमुखांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालून कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची व आरोग्याची योग्य ती दक्षता घ्यावी, अशी मागणी होत आहे.

### तोंडाला रुमाल बांधून काम

महापालिकेकडून मास्क किंवा इतर सुरक्षा साधने मिळत नाहीत. त्यामुळे अनेक स्वच्छता कर्मचारी तोंडाला रुमाल किंवा इतर कापडी साधने बांधून काम करताना दिसतात. विशेष म्हणजे अधिकारी, संबंधित ठेकेदार हे उघड्या डोळ्यांनी पाहतात. तरीदेखील कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधने पुरविली जात नाहीत. या कर्मचाऱ्यांचे हक्क सर्रास डावलले जात असल्याचे निदर्शनास येत असून, प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत आहे.



हातामध्ये ग्लोज नाहीत, तोंडाला मास्क नाही, अशा परिस्थितीत काम करणारे महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी छायाचित्रात दिसत आहे. (छाया - धनेश कटारिया)

# नगर शहरात मध्यरात्री धार्मिक स्थळाची तोडफोड

## धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी गुन्हा दाखल

नगर - शहरात मध्यरात्री तोफखाना भागातील पठार शाहावली दर्ग्याची अज्ञात व्यक्तीने जाणीवपूर्वक तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जुना मंगळवार बाजार येथील रहिवासी आणि व्यावसायिक आवेज तमीजोद्दीन काझी हे मध्यरात्री दोनच्या सुमारास मित्रांसोबत दिल्ली गेटकडून घरी जात होते. तोफखाना रस्त्यावरून जात असताना त्यांना पठार शाहावली दर्ग्याजवळ संशयास्पद पांढऱ्या रंगाचा टेम्पो उभा असलेला दिसला. दर्ग्याची पाहणी केली असता, दर्ग्याची वरच्या बाजूने तोडफोड करून नुकसान केल्याचे त्यांच्या लक्षात आले.

काझी आणि त्यांच्या मित्रांनी तातडीने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. धार्मिक भावना दुखावण्याच्या उद्देशाने ही तोडफोड करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. आवेज काझी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक एकशिंगे करत आहेत.

घटनास्थळी पोलिसांनी पाहणी केली असून शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आजारावर चमत्कारीक औषध देण्याच्या नावाखाली लाखोंची फसवणूक

## नगरमध्ये भोंदूगिरी करणाऱ्या पती पत्नीवर गुन्हा दाखल

नगर - नगर शहरात काही दिवसांपूर्वीच जादू टोणा करण्याच्या नावाखाली एका कुटुंबाची फसवणूक करण्याची घटना ताजी असतानाच आता पुन्हा एकदा अंधश्रद्धेचा व भोंदूगिरीचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. अंगाच्या दुखण्यावर विभूती व चमत्कारीक औषध देण्याचा दावा करून एक भोंदूबाबा आणि त्याच्या साथीदाराने महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १० लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल उकळून महिलेची फसवणूक केली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत भूतकरवाडी येथील महिलेने फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गणेश उर्फ टिंग्या मसुदेव पोटे (रा. रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) आणि त्याची पत्नी वर्षा गणेश पोटे (रा. रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना शुगर (मधुमेह) असल्यामुळे त्यांच्या शरीरात अंगदुखी, हातपाय व पाठदुखीचा त्रास होत होता. जुलै २०२६ च्या पहिल्या आठवड्यात त्या आपल्या माहेरी (गाडळकर मळा, रेल्वे स्टेशन) वडिलांना भेटण्यासाठी गेल्या होत्या. तिथे एक इसम दूध घेण्यासाठी आला असता त्याने फिर्यादीच्या आजाराविषयी विचारपूस केली आणि मढीवरून विभूती (पावडर) आणल्याचे सांगून ती रोज सकाळी पाण्यातून घेण्यास सांगितले. त्यानंतर आरोपी गणेश पोटे याने विभूतीचे ५० हजार रुपये मागितले व ते फिर्यादीच्या आईने दिले. तसेच आरोपीने फिर्यादीचा मोबाईल नंबर घेतला आणि नंतर स्वतःच्या नंबरवरून त्यांना फोन करून संपर्क साधला. त्यानंतर आरोपीने फिर्यादीला फोन करून सोन्याची नथ करण्यासाठी विधी करावा लागेल असे सांगितले व सोन्याची मागणी केली. नथ न दिल्यास नवऱ्याला मारून टाकण्याची आणि रक्ताची उलटी करायला लावण्याची धमकी दिली. भीतीपोटी फिर्यादीने भुतकरवाडी चौकातील महादेवाच्या मंदिरात जाऊन ५ तोळे वजनाचा सोन्याचा राणी हार (किंमत २ लाख रुपये), २ तोळे वजनाचे सोन्याचे नेकलस (किंमत ८० हजार), ३ तोळे वजनाचे कानातले झुबे (किंमत १ लाख २० हजार), ३ तोळे वजनाचे मंगळसूत्र (किंमत १ लाख २० हजार), आणि १२ तोळ्यांच्या सोन्याच्या एकूण ६ बांगड्या (किंमत ४ लाख ८ हजार) असे एकूण सोन्याचे दागिने व रोख रक्कम मिळून १० लाख ५० हजार रुपये) तसेच रोख रक्कम असा ऐवज आरोपींना दिला. त्यानंतरही जेव्हा फिर्यादीने पाठीदुखी आणि आजारात काहीच फरक पडत नसल्याचे सांगत दिलेल्या सोन्याची मागणी केली, तेव्हा आरोपीने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक समाधान सोळंके पुढील तपास करत आहेत.

रूबी हॉल क्लिनिक, पुणे येथील प्रथितयश व निष्णात छाती (फुप्फुस) विकार व ॲलर्जी विकार तज्ञ
डॉ. स्नेहा तिरपुडे MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine) Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)
- नियोजित अहिल्यानगर भेट -
गुरूवार 06 ऑगस्ट 2026 रोजी स.9 ते दु.2 पर्यंत
जर आपणांस खालील व्याधी असल्यास
• फुप्फुसाचे सर्व आजार • झोपे संबंधीचे सर्व विकार
• ॲलर्जी विकार • दमा • न्युमोनिया • न थांबणारा खोकला
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी अहिल्यानगर भेट
स्थळ : आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर
अधिक माहितीसाठी संपर्क : भरत : 8208783915

पाऊल टाका स्टाईलमध्ये
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे | महिलांसाठी पादत्राणे | मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स,
स्नीकर्स, कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज,
स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल,
बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे
वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका!
ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला

फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर, मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अण्णाभाऊ साठे जयंती मिरवणुकीत जप्त केलेल्या वाहनाची पोलीस ठाण्याच्या आवारातूनच धाडसी चोरी

नगर - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती मिरवणुकीदरम्यान पोलिसांनी जप्त केलेला आणि पोलीस ठाण्याच्या आवारात उभा केलेला १० लाख रुपये किमतीचा डीजे साहित्यासह टेम्पो पळवून नेल्याची घटना समोर आली आहे. थेट नगर तालुका पोलीस ठाण्याच्या पार्किंगमधूनच हे वाहन पळवून नेण्यात आल्याने पोलीस वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार अंकुश आदिनाथ कासार यांनी फिर्याद दिली आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव पोलिसांनी पांढऱ्या रंगाचा टाटा कंपनीचा टेम्पो (क्र.एमएच १६ बी ३६५६) व त्यातील डीजे साहित्य जप्त केले होते. जप्त केलेले हे वाहन सुरक्षिततेसाठी नगर तालुका पोलीस स्टेशनच्या पार्किंगच्या आवारात उभे करून ठेवण्यात आले होते.

दरम्यान, २ ऑगस्ट रोजी मध्यरात्री पावणेएक वाजेपासून ते ३ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजेच्या दरम्यान आरोपींनी संगनमत करून ही धाडसी चोरी केली. केकती भिंगार येथील रहिवासी विवेक सुभाष खोमणे आणि सैनिक नगर भिंगार येथील रहिवासी सुनील सत्यवान नवगिरे या दोघांनी पोलिसांच्या कायदेशीर रखवालीत असलेला १० लाख रुपयांचा टेम्पो आणि डीजे साहित्य चोरून नेले.

सदर प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलीस हवालदार अंकुश कासार यांच्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आरोपी विवेक खोमणे आणि सुनील नवगिरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार म्हस्के आणि टकले करत आहेत.

# घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा काळाबाजार तसेच बेकायदेशीर वापराबाबत केंद्र सरकारची मोठी कारवाई

## पेट्रोलियम मंत्रालयाला चौकशीचे निर्देश



नवी दिल्ली - घरगुती (१४.२ किग्रॅ) एलपीजी सिलिंडरचा व्यावसायिक व वाहनांमध्ये होणारा बेकायदेशीर वापर, काळाबाजार आणि यामुळे होणारा महसूल तूट व सुरक्षेचा गंभीर प्रश्न याविरोधात केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाने मोठी दखल घेतली आहे. 'ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन' या संस्थेने दिलेल्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत, केंद्र सरकारच्या 'उपभोक्ता मामले विभागा'ने हे प्रकरण पुढील कारवाईसाठी आणि चौकशीसाठी केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाकडे वर्ग केले आहे.

'ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन'च्या वतीने केंद्र सरकारकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. यामध्ये खालील गंभीर बाबींवर लक्ष वेधण्यात आले होते. १४.२ किग्रॅ घरगुती एलपीजी सिलिंडरमधून 'टिल्लो पंपा'चा वापर करून पाइपद्वारे बेकायदेशीरपणे वाहनांमध्ये व व्यावसायिक वापराच्या सिलिंडरमध्ये गॅस रिफिल केला जात आहे. यामुळे स्फोट / अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला असून प्रवाशांच्या व नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होत आहे.

घरगुती एलपीजीवर ५ टक्के जीएसटी लागू आहे, तर व्यावसायिक एलपीजीवर १८ टक्के जीएसटी लागू आहे. घरगुती गॅसचा बेकायदेशीर वापर व्यावसायिक कामांसाठी केल्याने सरकारचा १३ टक्के जीएसटी महसूल बुडत आहे. एलपीजी वितरक आणि काळाबाजार करणाऱ्यांचे साटेलोटे असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. ऑनलाइन बुकिंगच्या नावाने ग्राहकांच्या नकळत किंवा उज्वला योजनेतील लाभार्थ्यांच्या नावे बोगस बुकिंग दाखवून हे सिलिंडर काळ्या बाजारात वळवले जात आहेत. फाउंडेशनने राज्यातील १५९ जिल्ह्यातील ५९९०० हून अधिक हॉटेल, ढाबे, फास्ट फूड सेंटर्स व रेस्टॉरंट्सची यादीच पुराव्यासह शासनाला सादर केली होती, जिथे घरगुती सिलिंडरचा व्यावसायिक वापर सर्रास सुरू आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाचे अवर सचिव विकास कुमार यांनी २९ जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या कार्यालयाज्ञापनानुसारहे प्रकरण 'जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५'अंतर्गत पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या अखत्यारीत येते. त्यामुळे 'ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन'च्या तक्रारीची आणि पुराव्यांची सखोल तपासणी करून, दोषींवर व संबंधित गॅस एजन्सींवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, असे निर्देश पेट्रोलियम सचिवांना दिले आहेत.

### ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनची भूमिका

ग्राहक हक्क व सार्वजनिक सुरक्षिततेसाठी काम करणाऱ्या 'ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन'ने या निर्णयाचे स्वागत केले असून, केवळ महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशभरात अशा प्रकारे चालणाऱ्या अवैध गॅस रिफिलिंग रॅकेटवर व दोषी गॅस वितरकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची आणि केंद्र सरकारच्या तिजोरीचे होणारे नुकसान थांबवण्याची मागणी केली आहे.

# गोमांस विक्री करणाऱ्यांवर नगर व भिंगारमध्ये पोलिसांची कारवाई

नगर - नगर व भिंगार शहरात पोलिसांनी गोवंश कत्तल आणि अवैध मांस विक्री करणाऱ्या टोळ्यांवर मोठी कारवाई करत दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापा टाकला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने भिंगार कॅम्प आणि तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या या धडक कारवाईत एकूण चाळीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणी संशयितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली घटना भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोमीन गल्ली येथे घडली, जिथे एका पत्र्याच्या शेडमध्ये गोमांसाची कत्तल करून ते विक्रीसाठी ठेवण्यात आले असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी गुरुवारी सकाळी संबंधित ठिकाणी छापा टाकला असता, तिथे आदिल आमीन कुरेशी हा इसम गोमांस कत्तल करताना आणि विक्रीसाठी बाळगताना रंगेहात मिळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून बारा हजार रुपये किमतीचे सुमारे साठ किलो गोमांस, मांस कापण्याचे हत्यार आणि वजन काटा असा एकूण चौदा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, त्याच्या विरोधात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी कारवाई तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोठला परिसरातील झोपडपट्टी व मस्तानशहा चौक बोळीतील एका पत्र्याच्या खोलीत करण्यात आली. तिथे महाराष्ट्र शासनाची बंदी असतानाही बेकायदा गोवंश कत्तल करून मांस विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईदरम्यान शेख मोहम्मद आवेझ या इसमाला ताब्यात घेण्यात आले असून, त्याने हा व्यवसाय बाबु कुरेशी याच्या सांगण्यावरून व त्याच्या मालकीचा असल्याचे निष्पन्न केले. पोलिसांनी या ठिकाणावरून वीस हजार रुपये किमतीचे शंभर किलो गोमांस, हत्यारे आणि पाच हजार रुपयांचा इलेक्ट्रीक वजन काटा असा एकूण सविसा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी शेख मोहम्मद आवेझ आणि बाबु कुरेशी यांच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# सात महिन्यांत ३२ कारवाया; १.७८ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

## अंमली पदार्थांच्या साखळीच्या मुळापर्यंत पोहोचणार : पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

नगर - युवा पिढीचे संरक्षण आणि जिल्हा अंमली पदार्थमुक्त करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलीस प्रशासनाने अंमली पदार्थांविरोधातील कारवाई अधिक तीव्र केली असून, या गुन्हेगारी साखळीच्या मुळापर्यंत पोहोचण्यासाठी विशेष तपास सुरू करण्यात आला आहे. गेल्या सात महिन्यांत जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या ३२ कारवाया करण्यात आल्या असून ५९ आरोपींकडून सुमारे ६४० किलो अंमली पदार्थांसह १ कोटी ७८ लाख ५७ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात ४ ऑगस्ट रोजी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे उपस्थित होते. पोलीस अधीक्षक सुदर्शन म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्याची भौगोलिक रचना आणि पुणे, नाशिक तसेच मुंबई या प्रमुख शहरांशी असलेली जवळीक लक्षात घेता एमडीसारख्या अंमली पदार्थांची गुप्त मार्गाने तस्करी व विक्री होत असल्याचे तपासातून समोर येत आहे. या रॅकेटच्या केवळ स्थानिक विक्रेत्यांवर कारवाई करून न थांबता त्यामागील मुख्य पुरवठादार आणि संपूर्ण साखळी उघड करण्यासाठी विशेष तपास पथके काम करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तरुण पिढीला व्यसनाच्या विळख्यातून मुक्त करून व्यसनमुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने आणि ड्रग्जमुक्त अहिल्यानगर या संकल्पनेतून येत्या ६ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता पोलीस मुख्यालयातून भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, विविध संघटना आणि नागरिक सहभागी होणार असून सर्वांना नशामुक्तीची शपथही देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, तसेच जिल्ह्यातील खासदार, आमदार आणि विविध मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

दरम्यान अंमली पदार्थांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरातील टपऱ्या व संशयित ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणाच्या आधारे पुन्हा विशेष मोहीम राबवून कारवाई करण्यात येणार असल्याचे सुदर्शन यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी जनजागृतीबरोबरच प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यात वाहतूक शिस्तीसाठी ट्रिपल सीट, विनानंबर प्लेट, धोकादायक पद्धतीने वाहन चालविणे आणि इतर नियमभंग करणार्या वाहनचालकांविरोधात सातत्याने कठोर कारवाई सुरू राहणार आहे.

तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी विविध विशेष उपक्रम आणि गस्त वाढविण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. जिल्ह्यातील गुन्हेगारीवर अधिक प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी टू प्लस टू या विशेष योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक पोलीस ठाणास्तरावर स्वतंत्र पथके स्थापन करून प्रतिबंधात्मक कारवाई, गुन्हेगारांवर लक्ष आणि गस्त वाढविण्यात येणार आहे. याशिवाय टाकळी ढोकेश्वर येथे नव्या पोलीस ठाण्यास शासनाची मंजुरी मिळाली असून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यानंतर ते कार्यान्वित करण्यात येईल, अशी माहितीही सुदर्शन यांनी दिली.

## बन्सीभाऊ अकोलकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - केडगाव, वैष्णवनगर येथील रहिवासी बन्सीभाऊ अकोलकर (वय ८४) यांचे ४ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर केडगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ सुना, नातवंडे, पत्नी असा परिवार आहे. भरत अकोलकर यांचे ते वडील होत.


## चंद्रभागाबाई चव्हाण यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बऱ्हाणपूर (ता.नेवासा) येथील रहिवासी गं.भा. चंद्रभागाबाई निवृत्ती चव्हाण (वय ८०) यांचे ५ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बऱ्हाणपूर (ता.नेवासा) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गणपत चव्हाण यांच्या त्या मातोश्री होत.

## प्रभाकर वाघमारे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नालेगाव, वाघगल्ली येथील रहिवासी प्रभाकर रामभाऊ वाघमारे (आप्पा वाघमारे) (वय ७४) यांचे ३ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, २ मुली, ३ भाऊ, १ बहिण, सूना, भाऊजया, जावई, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. ते जिल्हा न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य बेलिफ होते.

## अमरचंद शिंगवी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - दहिगाव शे येथील ज्येष्ठ नागरिक अमरचंद किसनदास शिंगवी (अंबरकाका, वय ८२) यांचे ५ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पैठण अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे मुलगा, सुन, जावई, नातवंडे, पतवंडे, नातजावई असा परिवार आहे. रमेशलाल शिंगवी तसेच दहिगाव शे चे माजी सरपंच स्व. महावीर (बाळुशेठ) शिंगवी यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# भरदिवसा महिलांचे दागिने लुटणारे केडगावचे ३ आरोपी जेरबंद

## ४ गुन्हे उघडकीस, ३ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत


भरदिवसा महिलांचे दागिने लुटणाऱ्या तिघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर - नगर तालुक्यातील सारोळा कासार, खडकी, घोसपुरी परिसरात शेतात जाणाऱ्या महिलांचे सोन्याचे दागिने जबरीने ओढून चोऱ्या करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी ३ मुख्य आरोपींसह ५ जणांना जेरबंद केले असून, त्यांच्याकडून ४ जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. कारवाईदरम्यान पोलिसांनी १ लाख ३० हजार १०० रुपयांचा मुद्देमाल तसेच आरोपींनी विकलेल्या सोन्याच्या लगडी असा एकूण ३ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

२९ जुलै रोजी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास फिर्यादी सौ. केशर नामदेव कोठुळे (वय ५०, रा. खडकी, ता. नगर) या अकोळनेर ते खडकी रोडने जात असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने चोरून नेले होते. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या शिवाय सारोळा कासार, खडकी, घोसपुरी परिसरात असे एकूण ५ गुन्हे घडले होते.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला जिल्ह्यातील उघडकीस न आलेले जबरी चोरीचे गुन्हे शोधून काढण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक हरिष भोये आणि पोलीस अंमलदारांचे एक विशेष पथक तयार करून त्यांना तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे तपासाबाबत सूचना दिल्या होत्या.

या पथकाला ३ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, सदर गुन्हा नितीन जपकर चव्हाण (रा. भूषणनगर, केडगाव) याने आपल्या साथीदारांसह केला असून ते दोन मोटरसायकलवरून आरणगाव येथून कानेटीक चौकाकडे येत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी आरणगाव ते अहिल्यानगर मार्गावरील मेहेरबाबा समाधी परिसरात सापळा रचला. पोलिसांना पाहताच दोन्ही मोटरसायकलवरील तीन इसम पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. पोलिसांनी तातडीने पाठलाग करून दोन इसमांना ताब्यात घेतले, तर एक इसम पळून जाण्यात यशस्वी झाला.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांची चौकशी केली असता त्यांनी आपली नावे नितीन जपकर चव्हाण (वय ४५) आणि रोहित नितीन चव्हाण (वय २०, दोन्ही रा. भूषणनगर, केडगाव) असल्याचे सांगितले. तसेच पळून गेलेल्या तिसऱ्या इसमाचे नाव सुमित नितीन चव्हाण (रा. भूषणनगर, केडगाव) असल्याचे त्यांनी निष्पन्न केले. पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपींकडून १ लाख २० हजार रुपये किमतीच्या दोन मोटरसायकल, १० हजार रुपये किमतीचा मोबाईल आणि १०० रुपये किमतीचा लोखंडी चाकू असा एकूण १ लाख ३० हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासादरम्यान ताब्यात घेतलेला आरोपी नितीन जपकर चव्हाण याने कसून चौकशी केल्यानंतर त्याने इतर साथीदारांसह आणि रूक्षा गहिणीनाथ भोसले (रा. थेरगाव, ता. कर्जत) यांच्या मदतीने नगर व कर्जत तालुक्यामध्ये केलेल्या गुन्ह्यांची माहिती दिली. त्यानुसार नगर तालुका पोलीस ठाण्यातील तीन आणि मिरजगाव पोलीस ठाण्यातील एक असे एकूण चार गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत.

आरोपींनी चोरी केलेले सोन्याचे दागिने आपसात वाटून घेतले होते. त्यापैकी काही दागिने त्यांनी केडगाव येथील एका सोनाराला आणि काही दागिने विपुल अशोक टगारे (वय २६, रा. भूषणनगर, केडगाव) यास विक्रीसाठी दिल्याची माहिती दिली. पोलिसांनी तातडीने विपुल टगारे याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले आणि त्याच्याकडून २० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल हस्तगत केले. त्यानंतर पोलिसांनी संबंधित सोनारांना चौकशीकामी हजर राहण्याची नोटीस बजावली. सोनारांनी पंचासमक्ष ५६ हजार रुपये किमतीची ४ ग्रॅम, १ लाख ५ हजार रुपये किमतीची ७.५ ग्रॅम, ४२ हजार रुपये किमतीची ३ ग्रॅम, २८ हजार रुपये किमतीची २ ग्रॅम आणि ७० हजार रुपये किमतीची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड असा एकूण ३ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या सुपूर्द केला.सर्व ताब्यात घेतलेल्या आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी नगर तालुका पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, पुढील तपास नगर तालुका पोलीस करीत आहेत.

# न्यायालयाला चकवा देणाऱ्या ३२ आरोपींवर पोलिसांची कारवाई

नगर - तोफखाना पोलीस ठाण्याच्या पथकाने राबविलेल्या विशेष कोम्बिंग ऑपरेशनमध्ये न्यायालयीन वॉरंट असूनही फरार राहणाऱ्या ३२ आरोपींवर कारवाई करण्यात आली. यामध्ये २३ नॉन-बेलेबल वॉरंट असलेल्या आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, ९ बेलेबल वॉरंट असलेल्या आरोपींकडून जामीन बंधपत्र भरून घेण्यात आले.

तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोमवारी (३ ऑगस्ट) पहाटे ही विशेष मोहीम राबविण्यात आली. न्यायालयाने जारी केलेल्या वॉरंटची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस पथकाने विविध भागांत एकाचवेळी धाडी टाकत फरार आरोपींचा शोध घेतला. या मोहिमेदरम्यान अनेक वर्षांपासून पोलिसांना चकवा देणारा सराईत गुन्हेगार सुमेध उर्फ टिंग्या किशोर साळवे यालाही अटक करण्यात आली. त्याच्याविरोधात विविध न्यायालयांत अनेक गुन्ह्यांचे खटले प्रलंबित असून, त्याच्या अटकेमुळे त्या प्रकरणांच्या सुनावणीला चालना मिळणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याशिवाय बेलेबल वॉरंट असलेल्या नऊ आरोपींकडून आवश्यक जामीन बंधपत्र भरून घेण्यात आले असून, त्यांना नियोजित तारखेला न्यायालयात हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गुन्हेगारांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आणि न्यायालयीन वॉरंटची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी यापुढेही अशा प्रकारची अचानक कोम्बिंग ऑपरेशन आणि वॉरंट बजावणी मोहीम नियमितपणे राबविण्यात येणार आहे. न्यायालयाला चकवा देणार्या आरोपींविरूध्द कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली तोफखाना पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांनी केली.

## रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्या दोघांना पकडले

नगर - रात्रीच्या वेळी काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयित रित्या बसलेल्या दोघांना कोतवाली पोलिसांच्या रात्रगस्त पथकाने पकडले आहे. रोहित सुभाष साळवे (वय २२, रा. भोसले आखाडा, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) आणि रोहित बाळू शिंदे (वय १९, रा. काळे गल्ली, भोसले आखाडा, अहिल्यानगर) अशी या दोघांची नावे आहेत.

कोतवाली पोलिसांचे पथक रात्रगस्त घालत असताना ४ ऑगस्ट रोजी पहाटे १.४५ वाजण्याच्या सुमारास त्यांना खाऊ गल्ली, पुणे स्टँडमागे भिंतीच्या आडोशाला दोन इसम रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन व स्वतःचे अस्तित्व लपवून काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने बसलेले दिसून आले. पोलिसांना पाहताच त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला असता, पोलिसांनी पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्लॉट घेऊन देण्याचे बहाण्याने ७ लाख २५ हजारांची फसवणूक

नगर - नवीन प्लॉट घेऊन देण्याचे आमिष दाखवून एका महिलेची ७ लाख २५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात राजेश सदोरामल पंजवानी उर्फ हिरा याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी कोमल प्रितम कौरानी या तारकपूर भागात ब्युटी पार्लरचा व्यवसाय करतात. आरोपी राजेश पंजवानी याची त्यांच्याशी ओळख झाली होती. त्याने प्लॉट आणि फ्लॅट खरेदी-विक्रीचे काम करत असल्याचे सांगितले. प्रोफेसर चौक परिसरातील एक प्लॉट दाखवून त्याची किंमत १५ लाख रुपये असल्याचे आरोपीने सांगितले.

प्लॉट मालकाला विसारापोटी पैसे द्यायचे आहेत, असे सांगून राजेश याने कोमल कौरानी यांच्याकडून ऑनलाईन ५ लाख रुपये घेतले. त्यानंतर कागदपत्रांच्या नावाखाली पुन्हा १ लाख रुपये घेतले. पुढे आणखी एक प्लॉट विकायला असल्याचे सांगून रोख स्वरूपात १ लाख आणि वैयक्तिक कामासाठी २५ हजार रुपये असे एकूण ७ लाख २५ हजार रुपये उकळले.

बरेच दिवस उलटूनही कागदपत्रे न मिळाल्याने महिलेने चौकशी केली. तेव्हा संबंधित मालकांनी प्लॉट विकायचाच नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने आपले पैसे परत मागितले. मात्र आरोपीने पैसे देण्यास टाळाटाळ केली. अखेर कोमल कौरानी यांनी तोफखाना पोलिसांत तक्रार दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक दळवी पुढील तपास करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### वेळेवर झोपा, वेळेवर खा

झोप आणि सकाळचा नाश्ता हे आरोग्याचे दोन मजबूत स्तंभ आहेत. पूर्वीपासून याला 'दिनचर्येचा नियम' मानले जाते आणि आता डॉक्टरही याला 'नैसर्गिक टॉनिक' म्हणतात. यात शरीराला लागणारी विश्रांती, ऊर्जा, पाणी आणि पोषक तत्वे एकाच वेळी मिळतात. यातील 'बायोलॉजिकल क्लॉक' पचन सुधारते, स्मरणशक्ती वाढवते आणि ताणतणाव कमी करते. ७-८ तासांची गाढ झोप आणि सूर्योदयाच्या आत केलेला नाश्ता म्हणजे रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचा सोपा उपाय आहे. लवकर उठणाऱ्यांसाठी हा नियम वरदान आहे, कारण यामुळे आळस जातो आणि कामात लक्ष लागते. प्रोटीन आणि फायबरमुळे शरीर मजबूत होते तर अँटिऑक्सिडंट्स आजार दूर ठेवतात. सकाळी पोट साफ होण्यासाठी, त्वचा ग्लो करण्यासाठी आणि केस गळती थांबवण्यासाठीही वेळेवर झोप आणि नाश्ता फायदेशीर आहे. आयुर्वेदात ब्रह्ममुहूर्तावर उठणे आणि हलका नाश्ता करणे याला दीर्घायुष्याचे रहस्य सांगितले आहे. पोहे, इडली, ओट्स, फळे, दूध अशा कोणत्याही स्वरूपात नाश्ता घेता येतो. महागड्या औषधांपेक्षा ही सवय सोपी, परवडणारी आणि रोजच्या जीवनाचा भाग असल्याने जास्त परिणामकारक ठरते.

## पाककला

### बासुंदी रोल

**साहित्य :** ब्रेड स्लाईस ८, फुल क्रीम दूध १ लिटर, साखर १/२ कप, केशर १०-१२ काड्या, वेलची पूड १/२ चमचा, बारीक चिरलेले काजू १ चमचा, बारीक चिरलेले बदाम १ चमचा, बारीक चिरले पिस्ते १ चमचा, तूप २ चमचे

**कृती :** जाड बुडाच्या भांड्यात दूध घालून मध्यम आचेवर उकळा. दूध अर्धे होईपर्यंत ढवळत राहा. त्यात साखर, केशर आणि वेलची पूड घाला. दूध घट्ट रबडीसारखे झाल्यावर गॅस बंद करा. त्यात अर्धे काजू, बदाम, पिस्ते मिसळा. ब्रेडच्या कडा कापून घ्या. ब्रेडवर लाटण्याने हलक्या हाताने दाबा. प्रत्येक स्लाईसवर तयार बासुंदीचे मिश्रण पसरवा. ब्रेड रोलप्रमाणे घट्ट गुंडाळा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप घाला. रोल ठेवून सर्व बाजूने हलके सोनेरी रंगावर भाजा. वरून उरलेले ड्रायफ्रूट्स भुरभुरा. तयार बासुंदी रोल केशराने सजवून थंड किंवा गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### टिकवा नात्यांतील स्थैर्य

नैऋत्य दिशा ही घराचा आधार आणि नात्यांची स्थिरता मानली जाते. या कोपऱ्यात जर जड आणि तुटका सामान ठेवला तर कुटुंबाला आधार देणारी शक्तीच कमकुवत होते. बेडरूममध्ये तुटक्या वस्तू ठेवल्याने झोप बिघडते आणि त्याचा थेट परिणाम जोडप्याच्या नात्यावर होतो. म्हणूनच घरातून वेळोवेळी साफसफाई करणे गरजेचे आहे. ज्या वस्तू दुरुस्त होऊ शकत नाहीत त्या ताबडतोब घराबाहेर काढा. फुटकी काच, तुटकी भांडी, बंद पडलेले इलेक्ट्रॉनिक सामान अजिबात साठवू नका. स्वच्छ, नीटनेटके आणि पूर्ण वस्तूंनी भरलेले घर ऊजावान असते.

## सौंदर्य

* शैम्पूनंतर कांद्याच्या रसाने किंवा ॲपल सायडर व्हिनेगर + पाण्याने शेवटची धुणी करा. केसांना नैसर्गिक चमक येते.
* जास्त ताणामुळे केस गळतात. रोज ७-८ तास झोप आणि हलका व्यायाम करा.
* स्ट्रेटनर, ड्रायरचा वापर कमी करा. वापरायचाच असेल तर हीट प्रोटेक्टंट लावा. ओले केस कधीच घट्ट बांधू नका.

## सल्ला

* भाजीमध्ये दही फाटू नये म्हणून भाजी उकळल्यारच मीठ टाका.
* धुतलेल्या पोह्यांवर लिंबाचा रस मिसळल्याने ते चिकटत नाहीत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, भरणी २०।१४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. १० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** नवीन कामात उत्साह राहील. खर्च जास्त होण्याची शक्यता. तब्येत नाजूक राहील.

**वृषभ :** आर्थिक स्थितीत सुधारणा दिसेल. कुटुंबासोबत वेळ जाईल. निर्णय घेण्यास वेळ लागेल.

**मिथुन :** बोलण्याने कामे होतील. जुनी कामे पूर्ण होतील. लहान प्रवास होऊ शकतो.

**कर्क :** मनात अस्वस्थता राहील. अडचणीतून मार्ग निघेल. जवळच्या लोकांची भेट होईल.

**सिंह :** कामात यश मिळेल. आत्म विश्वास वाढेल. वादविवाद टाळले जातील.

**कन्या :** अभ्यास/कामात प्रगती दिसेल. छोट्या गोष्टींमुळे आनंद. आरोग्याकडे लक्ष.

**तूळ :** सामाजिक क्षेत्रात मान वाढेल. खर्च वाढण्याची शक्यता. मन शांत राहील.

**वृश्चिक :** धाडसी निर्णय घेतले जातील. काही गोष्टी गुप्त राहतील. मेहनतीचे फळ मिळेल.

**धनु :** नवीन संधी समोर येतील. प्रवासात अडचण येऊ शकते. नात्यात चढ-उतार.

**मकर :** जबाबदारी वाढेल आणि ती पूर्ण होईल. पैशाची बचत होईल. संयमाची परीक्षा.

**कुंभ :** सर्जनशीलतेला वाव मिळेल. मित्रांकडून सहकार्य मिळेल.

**मीन :** भावना तीव्र राहतील. आध्यात्मिकतेकडे ओढ. जुने प्रश्न मार्गी लागतील.

# शब्दगंध क्र. ७४८९

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| | ■ | ७ | | | ■ | ८ | |
| ९ | १० | | ■ | ■ | ११ | | |
| ■ | | ■ | १२ | १३ | | ■ | |
| १४ | | १५ | | | ■ | १६ | ■ |
| | ■ | | ■ | ■ | १७ | | १८ |
| | ■ | १९ | २० | २१ | | ■ | |
| २२ | | | | | ■ | २३ | |

**आडवे शब्द :-** १) सूर्य उगवताना किंवा मावळताना त्याच्याकडील क्षितिजावर दिसतो तो लालसर प्रकाश ५) पलीकडे; झाडाखालचा ओटा ७) कडक कवच असलेला एक जलचर ८) विष्णूची पत्नी; लक्ष्मी ९) मुंबईतील एक भाग; सोपान; जिना; शिडी ११) उसापासून बनणारा एक गोड पदार्थ १२) प्रश्न १४) ढगांचा आवाज १७) घात करणारे; हानिकारक १९) अविभक्त मालमत्ता २२) जुलमी; श्रेष्ठ; खंबीर २३) तीर; शर

**उभे शब्द :-** १) संपत्ती; धन; वित्त २) तऱ्हा; भेद; रीत; वर्तणूक ३) गाईम्हशीचे आचळ; कासोटा; ओटी; कंबर; खोकला ४) निर्जीव शरीर; मुडदा; प्रेत ५) चाचणी; कस; परीक्षा ६) बेतासबेत; जमा आणि खर्च यांची बरोबरी १०) धोंडा; पत्थर ११) वर्ष; झाडाची त्वचा; शक; सन १२) अंगणात वगैरे केले जाणारे शेणाच्या पाण्याचे सिंचन १३) रस्ता; मार्ग; पथ १४) गडबड; गलबला; गोंधळ १५) गळ्यात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना १६) पीकवाढीसाठीचा एक घटक १७) खाण्यासाठी घेतलेला अन्नाचा गोळा; कवळ १८) सोपे नसलेले; अवघड; दुर्गम २०) कैफ; नशा; माज २१) योग्य; खरे; न्यायाचे

### शब्दगंध क्र. ७४८८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गं | ज | ■ | ग | र | ग | री | त |
| ड | म | ड | म | ■ | वा | स | र |
| की | ■ | क | जा | ग | ■ | ■ | ल |
| ■ | ज | व | ■ | ज | ळ | वा | ■ |
| प्र | मा | ण | शी | र | ■ | ट | ■ |
| का | व | ■ | त | ■ | वा | प | स |
| श | ■ | स | क | वा | र | ■ | ध |
| क | स | दा | र | ■ | स | मा | न |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** विद्या हीच खरी संपत्ती आहे, जी कोणीही चोरू शकत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### डावी की उजवी कुशी? झोपण्यासाठी कोणती बाजू आरोग्यासाठी उत्तम आहे?

रात्री झोपताना आपण कधी विचार करतो का की कोणत्या कुशीवर झोपल्याने शरीराला जास्त फायदा होतो? बहुतेक जण सवयीने झोपतात. कोणाला डावी कुशी आवडते तर कोणाला उजवी. पण आयुर्वेद आणि आधुनिक विज्ञान दोन्ही सांगतात की झोपण्याची दिशा फक्त आरामासाठी नसते, ती आपल्या पचन, हृदय आणि एकूण आरोग्याशी थेट जोडलेली असते.आपल्या शरीराची रचना अशी आहे की आपले हृदय छातीच्या डाव्या बाजूला असते. तसेच पोटाचा आकारही असा आहे की त्याचे तोंड वरच्या उजव्या बाजूला आणि शेवटचा भाग डाव्या बाजूला उतरतो. जेव्हा आपण डाव्या कुशीवर झोपतो तेव्हा हृदयाला रक्त पंप करायला गुरुत्वाकर्षणाची मदत होते. त्यामुळे हृदयावरचा ताण कमी होतो आणि रक्ताभिसरण सुरळीत राहते. याच्या उलट उजव्या कुशीवर झोपल्याने हृदयावर थोडा दाब येतो आणि रक्ताला वरच्या दिशेने जायला जास्त मेहनत करावी लागते.पचनाच्या दृष्टीने पाहिले तर डावी कुशी अधिक चांगली ठरते.

जेवण केल्यानंतर पोटातील अन्न डावीकडे झोपल्याने नैसर्गिकरित्या खाली सरकते. यामुळे गॅस, ॲसिडिटी आणि अपचनाचा त्रास कमी होतो. उजवीकडे झोपल्याने पोटातील आम्ल वरच्या दिशेने येऊ शकते आणि छातीत जळजळ होण्याची शक्यता वाढते. म्हणूनच जेवणानंतर लगेच झोपायचे असल्यास तज्ञ नेहमी डाव्या कुशीचा सल्ला देतात. आयुर्वेदात यालाच वामकुक्षी म्हटले आहे आणि ती पचनासाठी सर्वोत्तम मानली आहे.शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर टाकण्याचे काम करणारी लसिका प्रणाली देखील डाव्या बाजूने जास्त सक्रिय असते. डाव्या कुशीवर झोपल्याने शरीरातील घाण आणि विषारी द्रव्ये लवकर फिल्टर होऊन बाहेर पडतात. गरोदर महिलांसाठी तर डॉक्टर खास करून डावी कुशी सुचवतात कारण त्यामुळे गर्भाला आणि आईला दोघांनाही रक्तपुरवठा चांगला होतो.याचा अर्थ असा नाही की उजवी कुशी पूर्णपणे वाईट आहे.

ज्यांना श्वासाचा त्रास आहे, नाक बंद झाले आहे किंवा उजव्या फुफ्फुसाची समस्या आहे अशा काही लोकांना उजवीकडे झोपल्यावर आराम वाटतो. पोटावर झोपणे मात्र शक्यतो टाळावे कारण त्याने मानेचा आणि पाठीचा कणा वाकतो आणि सकाळी पाठदुखी होते. शेवटी सगळ्यात महत्वाचे म्हणजे सातत्य. रात्रभर एकाच बाजूने झोपणे शक्य नसते आणि तसे करण्याची गरजही नाही. पण प्रयत्न करा की झोपेच्या ६० ते ७० टक्के वेळ तुम्ही डाव्या कुशीवर घालवाल. छोटीशी सवय आहे पण त्याचे फायदे मोठे आहेत. चांगली पचनशक्ती, निरोगी हृदय आणि ताजेतवाने सकाळ यासाठी आजपासूनच डावी कुशी निवडा. कारण चांगली झोप म्हणजेच चांगले आरोग्य.

## मोठेपणा

एके दिवशी एका तलावाच्या काठावर शाहामृग आणि बदक भेटले. शाहामृग खूप उंच आणि मोठा होता. त्याच्या लांब मानेमुळे आणि पायांमुळे तो स्वतःला खूप भारी समजत होता. बदक मात्र छोटेसे होते. ते पाण्यात पोहताना आणि जमिनीवर चपळाईने चालताना दिसत होते.


शाहामृगाने हसत हसत बदकाला विचारले, अरे बदका, तू एवढा लहान आहेस. तुझ्यात काय खास आहे? बघ मला, मी किती उंच आहे! मी दूरवरचे सगळे बघू शकतो. मी वाळवंटातही राहू शकतो आणि ताशी ७० किमी वेगाने धावू शकतो!

बदक शांतपणे हसले आणि म्हणाले, होय, तुम्ही खूप मोठे आणि वेगवान आहात. पण मला एक गोष्ट येते जी तुम्हाला नाही येणार.

शाहामृग चिडला, काय? सांग बघू! बदक पाण्यात उतरले आणि छान पोहायला लागले. पाण्यावर तरंगत, डुबकी मारत ते खेळू लागले. मग ते पाण्यातून बाहेर आले आणि म्हणाले, मी पाण्यात पोहू शकतो. तुम्ही पोहू शकता का? शाहामृगाने पाण्यात पाय टाकला, पण तो लगेच गडबडला. त्याचे मोठे शरीर पाण्यात तोल जाऊ लागले आणि तो बुडायला लागला. बदकाने पटकन त्याला चोचीने पकडून काठावर आणले.

शाहामृगाला लाज वाटली. तो म्हणाला, मित्रा, मी उंच आहे, वेगवान आहे, पण तुझ्यासारखा पोहू शकत नाही. प्रत्येकात काहीतरी खास गुण असतो, हे आज कळले. बदक म्हणाले, हो. देवाने प्रत्येकाला वेगळी ताकद दिली आहे. कोणाला उडता येते, कोणाला पोहता येते, कोणाला धावता येते. आपण एकमेकांची नक्कल न करता आपल्यातला गुण ओळखला पाहिजे. त्या दिवसापासून शाहामृग आणि बदक चांगले मित्र झाले. शाहामृग बदकाला धावायला शिकवायचा आणि बदक शाहामृगाला पोहायला शिकवायचे.

बोध : प्रत्येक व्यक्ती वेगळी असते आणि प्रत्येकात काहीतरी खास गुण असतो. दुसऱ्याची निंदा न करता आणि स्वतःची तुलना न करता आपल्यातला गुण ओळखून तो वाढवला पाहिजे. एकत्र राहिल्याने आपण एकमेकांकडून खूप काही शिकू शकतो.



## आत्मशक्ति

### सर्व धर्म समभाव

करण`, उपचारपद्धतीतील शोधांचा फायदा इ.बाबत माहिती मिळवू शकतो. संगणकाद्वारा विविध क्षेत्रातल्या माहितीच्या संपर्कात येणे हे आमच्या सशक्त आत्म्यापासून मिळू शकणाऱ्या संपर्काचे एक छोटेस उदाहरण आहे. चैतन्य आत्मा ह्या सृष्टीतील सर्व प्राण्यांशी संपर्क साधू शकतो.ह्या अटूट बंधनाचे ज्ञान आमच्या जन्मजात ऐक्याची जाणीव करून देतो. नावड नव्हे आवड निर्माण करा !वेगवेगळ्या प्रकारच्या भीती. आम्हाला एकमेकांपासून अलग करतात. आम्ही जगाच्या एका विशिष्ट भागात जन्म घेतो. तेव्हा म्हणतो की, मी ह्या देशाचा वा त्या देशाचा रहिवासी आहे. आम्ही एखाद्या धर्मात जन्म घेतो तेव्हा सांगतो की, मी अमुक धर्म पाळतो. धर्म तर माणसांनी स्थापन केले आहेत. भगवान बुद्धाच्या अगोदर बौद्ध धर्म नव्हता.तसा येशू ख्रिस्ताच्या अगोदर ख्रिश्चन धर्मही नव्हता. संत, महात्मे व महापुरुष ह्यांच्या शिकवणी त्यांची शिकवण एकत्र करून वेगवेगळे धर्म स्थापन केले.बहुतेक आईवडिलांचा जो धर्म आहे तोच धर्म आम्ही स्विकारतो. एखादा अनाथ हिंदू बालक एखाद्या ख्रिश्चनाने दत्तक घेतला तर तो मोठा झाल्यावर ख्रिश्चन होऊ शकतो. अशाच प्रकारे आम्ही ज्या प्रदेशांत अथवा देशात जन्म घेतो तेथील राहणी व पद्धतीनुसार राहतो. उदा. बहुतेक लोक परमेश्वराची पूजा करतात, परंतु प्रार्थना करण्याची पद्धत त्या त्या ठिकाणच्या पद्धती, रूढीनुसार वेगवेगळी असते. भौगोलिक परिस्थितीमुळे ह्या रीतीरीवाजात निश्चितच फरक पडतो. उदा. ज्या देशात भरपूर पाणी उपलब्ध असते तेथे प्रार्थना करण्यापूर्वी प्रथम हातपाय धुतले जातात. पण वाळवंटी प्रदेशात मात्र पाण्याची कम तरता असल्याने उपलब्ध रेतीचा उपयोग करून हात स्वच्छ केले जातात व ह्या रूढींचा पुढे आचार विचारांत समावेश होतो. ह्याचप्रमाणे उष्ण हवाम ानाच्या देशांत, देवालयांत वा प्रार्थनास्थळी अनवाणी जातात. परंतु थंड हवेच्या देशांत तेथे पायांत चप्पल, बूट घातल्याशिवाय जाणे, व्यवहाराला धरून होत नाही. जसजसा काळ लोटतो तसतसे हवामानामुळे ज्या चालीरिती, रूढी बनतात. त्यांचाच पुढे धार्मिक नियमांत समावेश होतो.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### ऊर्जा

मुले पालकांचे विचार ग्रहण करतात

सुरेश ओबेरॉय : मी अशी अनेक उदाहरणे बघितली आहेत जिथे एक स्त्रीकडे आणि खेळकर मूल काही काळानंतर अचानक कोमात जाते. मग पालक त्या मुलाच्या गळ्यात धार्मिक प्रतीक आणि गाईत पाळण्यात ठेवण्यात तो झोपून जातो. लोक म्हणतात की कोणातरी करणे किंवा काळी जादू केली.

शिवानंदी : पालकांसाठी हेतू चांगला आहे - त्यांना त्यांच्या मुलाला सर्वात काही उत्तम हवे आहे. पण त्यासाठी त्यांच्यासाठी सर्वोत्तम ऊर्जा असणे गरजेचे आहे. मुलाला सर्वोत्तम ध्याच्या प्रक्रियेत पालक जर सतत ताणावाली आणि काळजीत असतील तर मुलांनाही तीव्र संवेदना मिळतील.

सुरेश ओबेरॉय : आणि जर पालक असा विचार करत असतील की, त्यांच्याकडे सर्वोत्तम देण्यासाठी पुरेशी साधने नाहीत, तर...

शिवानंदी : असं झाले तर मूल नकाराची किंवा अस्वीकृतीची ऊर्जा ग्रहण करते. आईचेच उदार आत्मा असताना, त्याला नकाराची, अस्वीकृतीची ऊर्जा मिळेल असा एकही विचार निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. एवढ्याच माणूस असणाऱ्या भावना काळाच्या दोन काळ लघु शकतो. बाबा आत्म्यावर खूप खोल संस्कार होतो. मागच्या जन्मातली तो आत्मा नकाराला गेलेला असू शकतो. जर या जन्मातही त्याच्यापर्यंत अशा प्रकारचा एक विचार जरी पोहोचला तर तो संस्कार दृढ होऊ शकतो. जेठा मूल जन्माला येणार असत, तेव्हा कित्येकदा कुटुंबातील काही सदस्य एका विशिष्ट लिंगासाठी त्यांची इच्छा व्यक्त करतात. त्यानुसार बाळासाठी खेळणी, कपडे इत्यादी खरेदी. पण जर उशिरा असलेले बाळ मुलगा असेल आणि कुटुंबातील सदस्य मुलीच्या स्वागताची तयारी करत असतील तर त्या आत्म्याला कशा प्रकारची संवेदना मिळतील?

सुरेश ओबेरॉय : त्याला असे वाटेल की तो अशा ठिकाणी जात आहे जिथे दुसऱ्याच कोणालातरी अपेक्षा आहे.

शिवानंदी :

नंतर आईवडिलांनी मूल स्वीकारले तरीही, गर्भधारणेत निर्माण केलेले विचार त्या मुलावर परिणाम करतील. एखादा विशिष्ट लिंगाबद्दल चर्चा करणे बाळासाठी चांगले नसते. त्यामुळे त्याचे खूप नुकसान होते.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : सांग, मेहनतीचं फळ काय असतं? विद्यार्थी : गुण, सर!

शिक्षक : मग अभ्यास का करत नाहीस?

विद्यार्थी : सर, नशिबावरही थोडा विश्वास ठेवायला हवा!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'लोह पडदा' Iron Curtain हा शब्द कोणी वापरला?

– विन्स्टन चर्चिल – १९४६

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### गहू

जगभरमध्ये तांदळाच्या खालोखाल गहू हे धान्य खाद्यान्न म्हणून वापरले जाते. सुमारे ५०% लोकांच्या आहारामध्ये गहू वापरला जातो. गहू जगभर पिकवला जातो. ख्रिस्तपूर्व काळात हे धान्य भारतात आले. गहू पिकविण्यामध्ये भारताचा संपूर्ण जगात चौथा क्रमांक आहे. विशेषत: पंजाब, उत्तरप्रदेश या ठिकाणी गव्हाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. गव्हाचे रोप साधारणपणे दीड ते दोन हात उंचीचे असून, ते पोकळ असते. या रोपाला ओंब्या येतात. या ओंब्यांमधूनच गव्हाचे दाणे तयार होतात. हेच दाणे गहू म्हणून वापरले जातात. याचे दोन प्रकार आहेत. लाल गहू व पांढरा गहू. गव्हाला हिंदीमध्ये 'गेहूँ', संस्कृतमध्ये 'गोधूम' म्हणून ओळखले जाते. सर्व अन्नधान्यांत गहू अत्यंत श्रेष्ठ गुणवत्तेचा असल्यामुळे त्याला धान्यांचा राजा समजले जाते.वृष्य: शीतो गुरुः स्निग्धो जीवनो वातपित्तहा ।संधानकारी मधुरो गोधूमः स्थैर्यंकृत्तमः ।।अष्टांग संग्रहऔषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : गहू मधुर गुणात्मक, शीत, रुचकर, पाचक, कफकारक, पित्तनाशक, स्निग्ध, अस्थिभंग साधणारा, बलकारक, पुष्टिकारक, वीर्यवर्धक, धातुवर्धक आहे.आधुनिक शास्त्रानुसार : गव्हामध्ये पिष्टमय पदार्थांचा साठा सर्वात जास्त असतो. त्याचबरोबर प्रथिने, खनिजे, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्व, सेल्युलोज हे पौष्टिक घटकही असतात. गहू जात्यावर दळला, तर त्यातील शरीरास आवश्यक असणारे औषधी घटक कायम टिकून राहतात. कारण जात्यावर दळताना दळण्याचा वेग हा कमी असतो, तसेच घिरणी इतकी उष्णताही निर्माण होत नाही. पर्यायाने अन्न व औषधी घटक जळून जात नाहीत व अशा पिठालाच आरोग्यपूर्ण गव्हाचे पीठ म्हणतात. गुजरात प्रदेशामध्ये गव्हापासून अतिशय पातळ फुलके बनविले जातात. ते फुलके फुगण्यासाठी एकदम उष्णतेच्या निखाऱ्यावर भाजतात. परंतु असे केल्याने उष्णतेमुळे फुलक्यांमधील जीवनसत्त्वे व शरीरास उपयुक्त पोषक घटक लवकर नष्ट होतात व त्यामुळे असे फुलके

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# पद्मशाली महिला सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा

नगर – पद्मशाली समाजातील महिलांना शासकीय योजनांची माहिती, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने नव्याने स्थापन झालेल्या पद्मशाली महिला सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या पदग्रहण व नोंदणी प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. दिल्लीगेट येथील संपर्क कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात समाजातील ज्येष्ठ महिला, माजी नगरसेविका आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



पद्मशाली महिला सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या पदग्रहण सोहळ्यात मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मशाली समाजाच्या प्रथम महिला नगरसेविका तथा ९४ वर्षीय ज्येष्ठ समाजसेविका सखुबाई संदुपटला या होत्या. प्रारंभी समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी नगरसेविका लक्ष्मीबाई गुंडू, राधाबाई गुरुड, शशिकला मुदीगंटी, विनाताई बोज्जा, अर्चनाताई बिज्या आदी महिलांचा सत्कार करण्यात आला.

पद्मशाली महिला सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा स्वाती शिरसुल म्हणाल्या, पद्मशाली समाजातील अनेक महिला पूर्वी विडी व्यवसायावर अवलंबून होत्या. हा व्यवसाय जवळपास बंद पडल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. अशा महिलांना शासनाच्या विविध योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना स्वाभिमानाने जगता यावे, यासाठी संस्था सातत्याने कार्य करणार आहे.

यावेळी काँग्रेसच्या माजी जिल्हाध्यक्षा तथा पद्मशाली समाज महिला मंडळाच्या माजी अध्यक्षा शामला बोरा यांनी महिलांना संघटित होण्याचे आवाहन केले. माजी नगरसेविका लक्ष्मीबाई गुंडू यांनी समाजातील विवाह विषयक समस्या मांडत युवक–युवतींच्या अपेक्षा कमी करून योग्य वयात विवाह होण्यासाठी संस्थेने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा गीताताई गिल्डा यांचा यावेळी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उत्तर देताना त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी संस्थेला आणि समाजाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

अध्यक्षीय भाषणात सखुबाई संदुपटला यांनी पद्मशाली समाज हा कष्टाळू, प्रामाणिक आणि शांतताप्रिय असल्याचे सांगत नव्या पिढीने शिक्षण, उद्योग आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजाचे नाव अधिक उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. तसेच महिलांनी सामाजिक नेतृत्व स्वीकारून समाजाच्या प्रगतीत सक्रिय भूमिका बजावावी, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात संस्थेच्या नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. स्वाती शिरसुल यांची अध्यक्षा, ज्योती बिज्या व सारिका म्याना यांची उपाध्यक्षा, रेणुका गाली यांची सचिव, तर पदमा म्याना यांची खजिनदार म्हणून निवड झाली. सदस्यपदी अन्य १५ महिलांची निवड करण्यात आली. सूत्रसंचालन सी.ए. सुनंदाताई रच्चा यांनी केले. रेणुका गाली यांनी आभार मानले. यावेळी रंजना क्यादर, लता पुलगम, शारदा सुंकी, नीता मंचे, रुक्मिणी संदुपटला, सावित्रीबाई गोने, अरुणा जंगम, अंबिका आडेप, ललिता दुडम, सोनी सब्बन, रूपाली शिरसुल आदी महिला उपस्थित होत्या.

# पीएच.डी. मिळविल्याबद्दल क्षीरसागर यांचा सारडा महाविद्यालयात सत्कार

नगर – १९९० नंतरच्या मराठी बालकादंबऱ्यांचा विशेष अभ्यास करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त केल्याबद्दल पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभागात तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या डॉ. अर्चना क्षीरसागर यांचा पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



पीएच.डी. पदवी मिळविल्याबद्दल डॉ. अर्चना क्षीरसागर यांचा सत्कार करताना पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. माहेश्वरी गावित.

क्षीरसागर या सारडा महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आहेत. हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी त्यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित म्हणाल्या, बालसाहित्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या, परंतु संशोधनाच्या पातळीवर काहीशा उपेक्षित राहिलेल्या विषयावर त्यांनी हे सखोल संशोधन पूर्ण केले आहे. १९९० नंतरच्या जागतिकीकरण, डिजिटलायझेशन आणि बदलत्या सामाजिक वातावरणाचा मराठी बालकादंबऱ्यांवर झालेला परिणाम या संशोधनात प्रामुख्याने अधोरेखित करण्यात आला आहे. १९९० नंतरच्या बालकादंबऱ्यांमधील विषयांचे बदलते स्वरूप, बालमन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा बालसाहित्यावर झालेला प्रभाव, बालसाहित्यातील आधुनिक भाषिक प्रयोग व शैली या सर्व घटकांचा अभ्यास या संशोधनात समाविष्ट आहे.बालसाहित्य हे कोणत्याही भाषेच्या समृद्धीचा पाया असते. १९९० नंतरच्या बालकादंबऱ्यांचा वेध घेऊन त्यांनी या क्षेत्रातील महत्त्वाची पोकळी भरून काढली आहे. त्यांचे हे संशोधन भविष्यातील अभ्यासकांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरेल, असे त्या म्हणाल्या. आजच्या डिजिटल युगात मुलांची वाचनसंस्कृती जपायची असेल तर आधुनिक बालसाहित्याचा सखोल अभ्यास होणे गरजेचे होते. या पदवीमुळे माझ्या संशोधनाला योग्य ती पोचपावती मिळाली आहे, असे क्षीरसागर यांनी सांगितले. याप्रसंगी मराठी विभागातील प्रा. डॉ. प्रतीक्षा गायकवाड, प्रा. डॉ. संगीता शेळके, प्रा. डॉ. दया जेठे उपस्थित होत्या.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालयात विद्यार्थिनींना दिले सायबर सुरक्षेचे धडे

नगर – राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील कॉम्प्युटर ॲप्लिकेशन विभागाच्या वतीने विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने सायबर सेफ्टी अवेअरनेस या विषयावरील विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.

महाराष्ट्र सायबर विभाग, महाराष्ट्र शासन, क्विक हिल फाउंडेशन आणि अहमदनगर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत हे सत्र पार पडले.

या वेळी विद्यार्थिनींना ऑनलाईन फसवणूक, सायबर गुन्हे, फिशिंग, सायबर बुलिंग, ओळख चोरी, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर, डिजिटल व्यवहारांमधील सुरक्षितता तसेच सुरक्षित इंटरनेट वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर थोपटे यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात कॉम्प्युटर ॲप्लिकेशन विभागाचे प्रमुख प्रा. अनुप शिंदे यांनी डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थिनींनी तंत्रज्ञानाचा जबाबदारीने व सुरक्षितपणे वापर करण्याचे आवाहन केले. क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर वॉरियर्स विभागातील प्रशिक्षित सायबर वॉरियर्स दिव्या वाडेकर आणि शितल केकान यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून सायबर धोके कसे ओळखावेत, त्यापासून बचावासाठी कोणती काळजी घ्यावी आणि सुरक्षित डिजिटल वर्तन कसे अंगीकारावे, याविषयी प्रभावी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. नम्रता देठे यांनी केले. यावेळी कॉम्प्युटर ॲप्लिकेशन विभागातील विभागप्रमुख प्रा. अनुप शिंदे, प्रा. प्रतीक्षा धामणे, प्रा. नम्रता देठे, प्रा. आकांक्षा पवार तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सध्याच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणारे हे मार्गदर्शन सत्र विद्यार्थिनींसाठी उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरले.

# रंगात दंगले चिमुकले हात; जिल्हा वाचनालयाच्या चित्रकला स्पर्धेला प्रतिसाद

**स्वातंत्र्य दिनानिमित्त सुमारे ११०० विद्यार्थ्यांचा सहभाग; १८ ऑगस्टला बक्षिस वितरण**

नगर – स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शालेय चित्रकला स्पर्धेला यंदा विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कोऱ्या कागदावर आपल्या कल्पनाशक्तीला रंगांची सुंदर साथ देत चिमुकल्यांनी देशभक्ती, निसर्ग, सामाजिक संदेश आणि विविध विषयांवरील आकर्षक चित्रे साकारली. बाई इचरजबाई फिरोदिया शाळेत पार पडलेल्या या स्पर्धेत सुमारे ११०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत स्पर्धेला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले.



जिल्हा वाचनालयाच्यावतीने आयोजित चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष वैद्य राजा ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी उपाध्यक्ष दिलीप पांढरे, सहकार्यवाह राहुल तांबोळी, संचालिका शिल्पा रसाळ, स्पर्धेचे समन्वयक किरण आगरवाल, कवी चंद्रकांत पालवे, लेखक गणेश भगत, सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुकडवाल, वर्षा जोशी, संजय गाडेकर, आर्यन मडूर, ओम केदारे आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष वैद्य राजा ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, चित्रकला ही केवळ रंगांची उधळण नसून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, सर्जनशीलतेला आणि संवेदनशीलतेला दिशा देणारी प्रभावी कला आहे. पुस्तक वाचनासोबतच चित्रकला, लेखन आणि सांस्कृतिक उपक्रमांमधून मुलांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडते. जिल्हा वाचनालय अशा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देत असून भविष्यातही अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप दिले जाईल, असे त्यांनी नमूद केले.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेत विविध विषयांवर कल्पक आणि आकर्षक चित्रे रेखाटली. पालक व शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत अशा उपक्रमांचे स्वागत केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार असल्याची माहिती स्पर्धेचे समन्वयक किरण आगरवाल यांनी दिली.



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन करताना वीर लहुजी यंग ब्रिगेड प्रतिष्ठानचे पदाधिकारी.

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य व सामाजिक विचार आजही प्रेरणादायी

**अनंत लोखंडे यांचे प्रतिपादन; वीर लहुजी यंग ब्रिगेड प्रतिष्ठानतर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंना अभिवादन**

नगर – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वीर लहुजी यंग ब्रिगेड प्रतिष्ठान यांच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना अनंत लोखंडे म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या प्रभावी लेखणी आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजातील वंचित, कष्टकरी, श्रमिक आणि शोषित घटकांचा आवाज बुलंद केला. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे सामाजिक विषमता, अन्याय आणि शोषणाविरोधात जनजागृती घडवून आणली. महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत, सामाजिक क्रांतीत तसेच श्रमिकांच्या हक्कांसाठी आणि वंचित समाजाच्या हितरक्षणासाठी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आणि नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत.ते पुढे म्हणाले की, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहितासाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

यावेळी वीर लहुजी यंग ब्रिगेड प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गणेश अरुण घोरपडे, सुनील भावर, अनंत लोखंडे, विठ्ठल उमाप, पंडित वाघमारे, श्रीकांत घोरपडे, किरण गुंजाळ, गणेश भालेराव, आकाश पवार, विनोद घोरपडे, कुमार काटे, आकाश नानवरे, सुरेश भालेराव, अनिकेत वराळ तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# गोपाळ समाजहित महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी शशी गव्हाणे तर उपाध्यक्षपदी रमेश गव्हाणे, आसाराम गव्हाणे यांची निवड

**जिल्ह्यासह तालुका कार्यकारिणी जाहीर**

नगर – गोपाळ समाजहित महासंघाची अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी घोषित करण्यात आली असून अध्यक्षपदी शशी गव्हाणे यांची तर उपाध्यक्षपदी रमेश गव्हाणे व आसाराम गव्हाणे यांची निवड करण्यात आली आहे. महासंघाचे मार्गदर्शक बाबासाहेब पवार, शंकर पवार, विजय पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली.



कार्यकारिणी अशी अध्यक्ष – शशी गव्हाणे, उपाध्यक्ष – रमेश गव्हाणे व आसाराम गव्हाणे, सचिव – नामदेव गव्हाणे, सहसचिव – सोन्याबापू माळी, युवक अध्यक्ष – संदीप जाधव, युवक उपाध्यक्ष – प्रविण जाधव सर, गणेश वंजारे सर, शहराध्यक्ष – राजेंद्र पवार, खजिनदार– ताराचंद वंजारे, कोषाध्यक्ष – भरत गव्हाणे, संपर्कप्रमुख – मच्छिंद्र लोणारे, जिल्हा संघटक – राजेश पवार, युवा संघटक – किरण जाधव. त्याचबरोबर महासंघाच्या अहिल्यानगर तालुका कार्यकारिणीचीही यावेळी निवड करण्यात आली. ही कार्यकारिणी अशी : अध्यक्ष – रामदास पवार, उपाध्यक्ष – संदीप गिरहे, सचिव – रामनाथ गव्हाणे, युवक अध्यक्ष – अनिल लोणारे, युवक उपाध्यक्ष – महेंद्र चौगुले, तालुका खजिनदार – भारत जाधव, कोषाध्यक्ष – भारत पवार, तालुका संघटक – विनोद राजू गव्हाणे, तालुका कार्याध्यक्ष – बहिरू धनगर, तालुका सल्लागार – मोहन गव्हाणे तसेच पारनेर तालुका अध्यक्ष पदी संभाजी चौगुले, उपाध्यक्ष पदी किरण गव्हाणे व दिलीप गिन्हे यांची तर राहता तालुका अध्यक्षपदी काशिनाथ गिन्हे, उपाध्यक्ष पदी विलास गिन्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गोपाळ समाजहित महासंघाचा मेळावा २ ऑगस्ट रोजी शेतकरी निवास सभागृह, मार्केट यार्ड या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी बाबासाहेब पवार होते. कार्यक्रमास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर तपासे कार्याध्यक्ष नंदकुमार पवार, सचिव शेकुराव वाणी, कोषाध्यक्ष अंबादास वाणी, राज्यसंघटक रविंद्र गव्हाणे, माजी अध्यक्ष सुभाष गव्हाणे, माजी सचिव डॉ भरत गव्हाणे, संजय भोसले, शेषराव मोरे यांच्यासह प्रमुख पाहुणे पदाधिकारी तसेच सर्व गोपाळ समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते या मेळाव्यात महासंघाची अहिल्यानगर जिल्हा व तालुका कार्यकारिणी एकमताने निवडण्यात आली.

गोपाळ समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचा निर्धार उपस्थित असलेल्या मान्यवरांनी व्यक्त केला.

# आचार्य बालकृष्ण महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त चांदबीबी महाल परिसरात वटवृक्षांचे रोपण

नगर – आचार्य बालकृष्ण महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त आणि जागतिक जडीबुटी दिनाचे औचित्य साधत पतंजली योग समिती, अहिल्यानगर व रक्षक अॅकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने चांदबीबी महाल परिसरात २० बारा फुटी वडाच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.



यावेळी बोलताना पतंजली योग समितीचे अध्यक्ष प्रा. बाळासाहेब निमसे यांनी वातावरणाचे संतुलन राखण्यासाठी तसेच मानवी आरोग्याच्या दृष्टीने वडाच्या झाडाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे सांगितले. वडाचे झाड २४ तास प्राणवायू (ऑक्सिजन) देणारे असून त्याची पाने, साल आणि पारंब्या यांचा आयुर्वेदामध्ये विविध प्रकारे उपयोग होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या पूर्वजांनी दिलेल्या आयुर्वेदिक परंपरेचा अवलंब करून पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने वृक्षारोपणात सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पतंजली योग समितीचे भारत स्वाभिमान प्रभारी अविनाश ठोकळे यांनी रक्षक अॅकॅडमीतील विद्यार्थ्यांसाठी योग व प्राणायाम शिबिर घेऊन योग – प्राणायामाचे आरोग्यदायी महत्त्व पटवून दिले.

या उपक्रमासाठी आवश्यक असलेली वडाची रोपे पतंजली योग समितीच्या योगशिक्षकांनी स्वखर्चाने निधी जमा करून खरेदी केली होती. सर्व योगशिक्षकांनी स्वेच्छेने वृक्षारोपणासाठी योगदान दिले. रक्षक अॅकॅडमीचे संचालक बडे यांनी अॅकॅडमीच्या परिसरात वृक्षारोपणासाठी जागा उपलब्ध करून दिली.

कार्यक्रमास पतंजली योग समितीचे सर्व योगशिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन समितीचे कोषाध्यक्ष मधुकर निकम यांनी केले.

# रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलच्यावतीने शिबिरात २५० विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

नगर – रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलच्या वतीने रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या दात हैं तो बात हैं या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत १ ऑगस्ट रोजी पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विद्यालयातील २५० विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी करण्यात आली.




प्रकल्पप्रमुख रो. डॉ. कुणाल कोल्हे (दंतचिकित्सक) यांनी विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी करून दंत आरोग्याचे महत्त्व, योग्य दंतस्वच्छता, संतुलित आहार तसेच भविष्यात दातांच्या समस्या टाळण्यासाठी आवश्यक उपचार वेळेत करून घेण्याचे महत्त्व विशद केले. यावेळी रो. अमर गुरप (अध्यक्ष) यांनी रोटरी इंटरनॅशनलच्या माध्यमातून जगभरात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, साक्षरता आणि विविध सामाजिक सेवा प्रकल्प राबविले जात असल्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत १ ऑगस्ट २०२६ ते ३१ मे २०२७ या कालावधीत १०० रोटरी क्लबांच्या माध्यमातून ५ लाख मोफत दंत तपासण्या करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, हा उपक्रम समाजासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या कार्यक्रमास रो. अमर गुरप (अध्यक्ष), रो. सुनील मुथा (सचिव), प्रकल्पप्रमुख रो. डॉ. कुणाल कोल्हे, रो. प्रभाकर बोगा, विद्यालयाचे प्राचार्य मच्छिंद्र राऊत, संतोष झरेकर, बाबासाहेब दौंड, अमृता लोंढे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# अहमदनगर एज्युकेशन सोसायटीतर्फे जिल्हास्तरीय भक्तिसुमन स्पर्धेचे आयोजन

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने जिल्हास्तरीय भक्तिसुमन स्पर्धा – २०२६ आयोजित करण्यात आली असून जिल्ह्यातील अभंग व भक्तिगीत गायनाची आवड असलेल्या स्पर्धकांसाठी ही एक उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. ही स्पर्धा वैयक्तिक अभंग व भक्तिगीत गायन प्रकारात होणार असून विविध वयोगटातील स्पर्धकांना सहभागाची संधी देण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी दोन गट निश्चित करण्यात आले आहेत. मोठा गट (जन्मतारीख २६ ऑगस्ट १९९६ ते २५ ऑगस्ट २०१०) आणि लहान गट (जन्मतारीख २६ ऑगस्ट २०१० ते २५ ऑगस्ट २०२१) असे विभाग करण्यात आले आहेत. दोन्ही गटांतील स्पर्धकांना आकर्षक रोख पारितोषिके तसेच प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

मोठ्या गटातील विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ७,००० रु., ५,००० रु. व ३,००० रु. तर तीन उत्तेजनार्थ प्रत्येकी १,००० रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. लहान गटातील स्पर्धकांसाठी प्रथम – ५,००० रु., द्वितीय ३,००० रु. व तृतीय २,००० रु. अशी रोख पारितोषिके असून तीन उत्तेजनार्थ प्रत्येकी ७०० रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.

स्पर्धा २६ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजल्यापासून आयोजित करण्यात येणार आहे. स्पर्धेचे ठिकाण अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूल, विश्रामबाग, अहिल्यानगर असे निश्चित करण्यात आले आहे. स्पर्धेच्या ठिकाणी स्पर्धक व गुरुजनांसाठी गरजेनुसार भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मूळ प्रवेश अर्जासोबत जन्मतारीख व ओळख सिद्ध करणाऱ्या कागदपत्रांची प्रत सादर करणे आवश्यक आहे. मोठ्या गटासाठी प्रवेश शुल्क ७०० रुपये तर लहान गटासाठी ५०० रुपये निश्चित करण्यात आले आहे. मोठ्या गटाला ५ मिनिटे आणि लहान गटाला ४ मिनिटे गायनासाठी वेळ दिला जाणार आहे.

स्पर्धकांनी मराठी भाषेतील अभंग, भक्तिगीत किंवा भक्तिरसप्रधान रचना सादर कराव्यात. गायनासाठी हार्मोनियम, तबला, टाळ, चिपळ्या तसेच इलेक्ट्रॉनिक तानपुरा यांसारख्या वाद्यांचा वापर करता येईल. स्पर्धेचे परीक्षण तज्ज्ञ परीक्षकांमार्फत करण्यात येणार असून परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील.

प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत १७ ऑगस्ट सायंकाळी ४ वाजेपर्यंत आहे. अधिक माहितीसाठी व प्रवेश अर्ज प्राप्त करण्यासाठी लहान गट – यशश्री कुलकर्णी (मो.नं. ७६२०२२०५७९) व मोठा गट – अपर्णा बालटे (मो.नं. ९४२०९४६२१७) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्पर्धा समन्वयक म्हणून पवन श्रीकांत नाईक कार्यरत असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त गायकांनी या भक्तिमय स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छाया फिरोदिया यांनी केले आहे.

# बोस्टनमध्ये भारतीय संस्कृतीचा वारसा जिवंत



राजकुमारी पद्मजा यांनी या अमेरिकेतील बोस्टन येथील घरात भारतीय संस्कृती आणि मेवाडचा राजेशाही वारसा जिवंत ठेवला आहे. भारतीय कलाकृतींनी हे आलिशान घर सजवण्यात आले असून घरासमोर प्रशस्त लॉन, सौंदर्याने नटलेल्या रुम्स आणि शाही बाथटबने सजलेल्या या घराची झलक पाहूनच मन प्रसन्न होईल.

मेवाडच्या राजकुमारीच्या या प्रशस्त घराचा दरवाजा एका साध्या पायऱ्यांच्या हॉलमध्ये उघडतो. पुढे तो एका आधुनिक लिव्हींग रुमकडे जातो. या लिव्हींग रुमला रंगीबेरंगी कुशन, एक सुंदर टेबल आणि एका पियानो सेटअप सह सजवण्यात आले आहे. त्यामुळे ही जागा अत्यंत उर्जादायी आणि पाहुण्यांचे स्वागत करण्यास परफेक्ट बनते. घराच्या प्रवेशद्वाराच्या हॉलमध्ये एक विशाल कलाकृती लावण्यात आली आहे. तसेच राजकुमारीचा एक शानदार फोटोही लावण्यात आला आहे. त्यामुळे या घराला एक पर्सनल टच मिळतो. घराच्या डिझाईनचा एक मोठा भाग भारतीय संस्कृतीशी संबंधित कलाकृतींनी सजवण्यात आला आहे. आपल्या मेवाड वारशाचा सन्मान करण्यासाठी राजकुमारी पद्मजा हिने जाणीवपूर्वक या इंटेरिअरची निवड केली आहे. घराचे डायनिंग रुम खूपच सुंदर आहे. येथील भिंती डार्क निळ्या रंगाच्या असून त्यांच्यावर एक मोठी कलाकृती लावलेली आहे.

घराच्या बेडरुमला 'मिनिमलिस्ट' अप्रोच अंगिकारुन डिझाईन केले आहे. यात क्लासिक क्विन-साईज बेड, आराम दायक बसायची जागा, एक फायरप्लेस आणि लँपचा समावेश आहे. प्रत्येक बेडरुमसोबत एक विशाल बाथरुम दिलेले आहे. त्यात एका चमकदार भिंतीसमोर एक मोठे आणि भव्य बाथटब ठेवलेले आहे. ते येथील शाही स्नान कसे असेल याची साक्ष देते. बाथरुमच्या संपूर्ण भागाला मुख्य रुपाने पांढऱ्या आणि चमकदार रंगाने सजवले आहे. घरात एक 'कव्हर्ड आऊटडोर सीटिंग एरिया' देखील आहे. तो थेट एका विशाल बगीच्यात उघडतो. ही जागा कुटुंब आणि मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी चांगल्या स्पेसचे काम करते. सायंकाळच्या थंड वातावरणाचा आनंद घेण्यासाठी येथे एक आरामदायक फायरप्लेस देखील तयार केलेले आहे.

राजकुमारी पद्मजा कुमारी परमार हिचे कुटुंब हयात असलेले जगातील शाही कुटुंब 'हाऊस ऑफ मेवाड'शी संबंधित आहे. याचा इतिहास १,५०० वर्षे जुना आहे. आज राजकुमारी पद्मजा साता समुद्रापार राहूनही या आपल्या या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाला सांभाळत असून त्याला जगाससमोर आणण्याचा प्रयत्न करत आहे.

## कॅलिडोस्कोप

# रिक्षा चालकाची अजब कमाई!

मुंबईच्या गर्दीत आणि वाहतुकीत दररोज हजारो ऑटोरिक्षावाले प्रवाशांच्या शोधात इकडे तिकडे धावतात. पण या ऑटोवाल्यांपैकी एकाने कमाईच्या बाबतीत इतरांना मागे टाकले. तो तास न तास ऑटो न चालवता, घाम न गाळता महिन्याला लाखो रुपये कमवू लागला. 'सोशल मीडिया'वर त्याच्या कमाईचे रहस्य उघड झाल्यानंतर सर्वांनाच आश्चर्य वाटले. सध्या त्याचे दुकान बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.



ही कहाणी मुंबईतील अमेरिकन दूतावासाच्या बाहेर सुरू झाली. दररोज मोठ्या संख्येने लोक व्हिसा मुलाखतीसाठी येथे येतात. पण दूतावासाचे नियम खूप कडक आहेत. आत जाताना कोणीही बॅग, मोबाईल किंवा पर्स घेऊन जाऊ शकत नाही. या हुशार ऑटोवाल्याने पैसे कमवण्यासाठी या संधीचा उपयोग करून घेतला. गेल्या आठवड्यात 'व्हेन्यू मंक'चे सह-संस्थापक राहुल रुपानी यांनाही व्हिसासाठी येथे यावे लागले. त्यांना त्यांची बॅग दूतावासात नेण्यापासून रोखण्यात आले तेव्हा त्यांना त्यांच्या सामानाचे काय करायचे याची चिंता वाटली. अचानक जवळच उभ्या असलेल्या एका ऑटो चालकाने त्यांना बॅग स्टोरेज इथे असून त्यासाठी फक्त एक हजार रुपये लागतील, असे सांगितले. राहुलला प्रथम तो कदाचित मस्करी करत असेल, असे वाटले. पण नंतर खरा प्लॅन उघडकीस आला. प्रत्येक बॅगसाठी एक हजार रुपये निश्चित करण्यात आले होते. तो रिक्षावाला दररोज अशा शेकडो लोकांच्या बॅगा सांभाळतो आणि प्रत्येक बॅगसाठी एक हजार रुपये घेता,असे राहूलला कळले. म्हणजे तो ऑटो न चालवता महिन्याला ५ ते ८ लाख रुपये कमवत होता.

दूतावासाबाहेर स्टोरेजसाठी कोणतीही अधिकृत व्यवस्था नव्हती म्हणून या रिक्षा चालकाने पोलिसांशी संगनमत करून हा व्यवसाय सुरू केला. लोक फक्त येऊन त्यांच्या बॅगा जमा करायचे आणि मुलाखतीसाठी दूतावासात जायचे. राहुलने त्याच्या लिंक्डइनवर अकाऊंटवर हा संपूर्ण प्रकार उघडकीस आणला तेव्हा 'सोशल मीडिया'वर एकच खळबळ उडाली. बिझनेस टायकून हर्ष गोयंका यांनीही त्यांची पोस्ट लाईक केली आणि या चालकाच्या जुगाडाला सलाम केला. तथापि, एका सामान्य माणसाला अशा प्रकारे मोठी रक्कम कशी द्यावी लागत आहे, यावरही लोक संतापले. पोस्ट व्हायरल होताच पोलिसांनी कारवाई केली. आता हा व्यवसाय बंद करण्यात आला आहे. रिक्षा चालकाची चौकशी केली जात आहे आणि कोणत्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा गेम सुरू होता याचाही तपास केला जात आहे.



# रस्ते बंद, तरी ऑफिसला या!

मध्यंतरी मुसळधार पावसामुळे पुण्यात अनेक भागांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले असताना एका कर्मचाऱ्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव वरिष्ठांकडे रजेची विनंती केली; मात्र संबंधित मॅनेजरने रजा मंजूर करण्यास नकार देत कोणत्याही परिस्थितीत कार्यालयात उपस्थित राहण्याचे निर्देश दिल्याची व्हॉट्सअॅप चॅट 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. ही बाब समोर आल्यानंतर 'सोशल मीडिया'वर संतापाची लाट उसळली असून अनेकांनी संबंधित मॅनेजरच्या भूमिकेवर कठोर टीका केली आहे. संबंधित कर्मचाऱ्याने सकाळी मॅनेजरला संदेश पाठवत, 'मुसळधार पाऊस आणि अनेक रस्ते बंद असल्यामुळे आज कार्यालयात येणे शक्य नाही,' असे कळवले. प्रतिकूल हवामानामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने रजेची परवानगी मिळेल, अशी त्याची अपेक्षा होती; मात्र मॅनेजरने त्याची विनंती नाकारत सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचा सल्ला दिला. इतर कर्मचारी मेट्रो ट्रेनने कार्यालयात आले आहेत. त्यामुळे तुम्हीही मेट्रो, रिक्षा किंवा उबरने या; पण कार्यालयात हजर राहा, असा संदेश पाठवल्याचे स्क्रीनशॉटमध्ये दिसत आहे.

ही व्हॉट्सअॅप चॅट संबंधित कर्मचाऱ्याच्या मित्राने रेडिटवरील पुणे समुदायात शेअर केली. पोस्टसोबत 'तो आता नोकरीचा राजीनामा द्यावा का, असा विचार करत आहे,' असेही नमूद करण्यात आले होते. त्यानंतर या पोस्टला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आणि ती इतर 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवरही व्हायरल झाली. ही घटना समोर आल्यानंतर अनेक 'सोशल मीडिया' वापरकर्त्यांनी संबंधित कंपनीच्या कामकाजाच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काहींनी कंपनीचे नाव जाहीर करण्याची मागणी केली, तर काहींनी अशा प्रकारचे स्वतःचे अनुभव शेअर केले.




# विचित्र नावांची गावे

काही गावांची विचित्र नावे ऐकून लोक सुरुवातीला हसतात. मग प्रश्न पडतो की हे नाव काय आहे? आणि ते कोणी दिले? उत्तर प्रदेशातील एका गावाचे नाव 'सुअर' आहे. कर्नाटकातील एका गावाचे नाव 'कुट्टा'. ही नावे ऐकल्यानंतर, एखाद्या व्यक्तीचा स्वतःच्याच कानावर विश्वास बसणार नाही; परंतु वस्तुस्थिती तशीच आहे.

रायपूरमधील एका गावाचे नाव 'लडकी' आहे, तर गंगापूर परिसरात 'रंगेली' आणि 'मेहंदी' गावेदेखील आहेत. करेरा परिसरात 'रेल' हेदेखील एका गावाचे नाव आहे. बिजोलियामध्ये सुंठी, बांका, भुंटी, फूलन अशी गावे आहेत. येथे सरकी कुंडी, नीमडी गावा, पापडबार अशी काहीही नावे आहेत. झरोली सर्कलमध्ये 'भोपी की राते' नावाचे एक गाव आहे. गावकऱ्यांच्या विनंतीवरून अनेक गावांची नावे बदलली जात असली तरी काही इतर गावांची नावे अजूनही तीच आहेत.

काहींची नावे अन्नपदार्थांवर आधारित आहेत. कोटडी परिसरातील एका गावाचे नाव 'प्याज' आहे. काही गावांची नावे लोकांच्या नावांवर आधारित आहेत. 'दयाराम जी का गुढा', 'रामसिंहजी खेडा' अशी ही नावे आहेत.

मंडल परिसरात 'भिलडी' नावाचे एक गाव होते. गावाचे नाव सांगायला लोकांना लाज वाटायची. त्यानंतर या गावाचे नाव रामनगर ठेवण्यात आले. मंडलगड परिसरात 'उंदरोन का खेडा' नावाचे एक गाव आहे. स्थानिक भाषेत उंदराला उंद्रा म्हणतात. त्याचप्रमाणे मीठा, सांड, 'मोचडियों का खेडा', गोठ, गोथरा हीदेखील ही गावांची नावे आहेत. जहाजपूर परिसरात एकलमाडी, उलेला, 'खाना का खोहला' ही गावे आहेत.. मंडलगड परिसरात, बदनपुरा, कोतवाल का खेडा अशी नावे आहेत. जहाजपूरमध्ये बिहाराला जीरा, गलिया, रोजडी अशी नावे आहेत. आसिंदमध्ये जाली, रायपूरच्या झाडोलमध्ये डांगरा-दांगडी अशी नावे ऐकू येतील. बिजोलियामध्ये शिकारगाह, तिखी, काकी, आती इत्यादी नावे आहेत. ती कोणालाही विचित्र वाटतील.





# भन्नाट चवींचे पदार्थ

मोदक, पाणीपुरी, मसाला मिल्क, मिरची, आलं-लिंबू हे आईस्क्रीमचे भन्नाट फ्लेवर्स खवय्यांना भुलवतात. पदार्थांमध्ये वेगवेगळी कॉम्बिनेशन्स केली जातात. चॉकलेट सँडविच, चॉकलेट डोसा, पावभाजी डोसा, पालक पनीर डोसा हे पदार्थ आज लोकप्रिय झाले आहेत. मात्र कोणाच्या डोक्यातून कोणती सुपीक कल्पना निघेल याचा नेम नसतो. आपण विचारही करू शकणार नाही, असे पदार्थ सध्या इंटरनेटवर लोकप्रिय ठरले आहेत. या पदार्थांचे फोटो बरेच व्हायरल होत आहेत. काहींना ही कल्पना भावली आहे तर काहींनी नाकं मुरडली आहेत. कुरकुरे मिल्कशेकची रेसिपी बरीच व्हायरल झाली आहे. कुरकुरे हा अनेकांचा आवडता पदार्थ आहे. मात्र कुरकुरे मिल्कशेक ही संकल्पना पचणं तसं कठीणच. गुलाबजाम पिझ्झाचा फोटोही व्हायरल झाला आहे. यात पिझ्झावर गुलाबजाम ठेवल्याचं पहायला मिळतं. मात्र अशा प्रकारच्या पिझ्झाचा विचारही आपण करू शकत नाही. अर्थात कोणाला कोणती चव आवडेल, हे सांगता येणार नाही. मात्र असले भन्नाट पदार्थ भविष्यात लोकप्रिय झाले तर आश्चर्य वाटायला नको.



# आयव्हीएफ तंत्राने जन्मला बेडूक!

आयव्हीएफ तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भधारणा केली जाते. अपत्यहीन जोडप्यांसाठी आयव्हीएफ तंत्रज्ञान हे एक वरदान ठरलं आहे. मात्र याच तंत्रज्ञानाचा वापर करून बेडकांची नष्ट होणारी प्रजाती जतन करण्याचं काम होत आहे. ओलफ प्रजातीच्या एका बेडकाचा जन्म आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे झाला आहे. ओलफ प्रजाती दुर्मीळ होत चालली आहे. १९८७ पासून या प्रजातीच्या बेडकांची संख्या खूप कमी झाली आहे. या प्रजातीच्या बेडकांचं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अमेरिकेतल्या टेक्सासमधलं फोर्ट वर्थ प्राणीसंग्रहालय आणि मिसिसिपी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या प्रक्रियेसाठी सहा नर बेडकांचे शुक्राणू गोठवून ठेवण्यात आले होते. या शुक्राणूंचं दोन मादी बेडकांच्या बीजांडांशी फलन घडवून आणण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आणि या बेडकाचा जन्म झाला. आयव्हीएफ तंत्रज्ञानाने जन्मलेल्या या बेडकाचं वजन अवघं सहा ग्रॅम आहे. फोर्ट वर्थ प्राणीसंग्रहालय आणि मिसिसिपी विद्यापीठ गेल्या अनेक वर्षांपासून हार्मोन थेरेपी आणि प्रजननाच्या कृत्रिम पद्धती विकसित करण्यावर काम करत आहेत. यामुळे भविष्यात विविध प्रजातींचं संरक्षण शक्य होणार आहे.

# डबा सजला 'हनीमून सूट'प्रमाणे

महाराष्ट्रातील बल्हारशाह ते दादरदरम्यान धावणाऱ्या 'नंदीग्राम एक्स्प्रेस'च्या फर्स्ट एसी डब्यात नवविवाहित जोडप्यासाठी 'हनीमून सूट'प्रमाणे सजावट करण्यात आल्याचा व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाला आहे. या घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने कारवाई करत संबंधित ट्रेन तिकीट परीक्षक (टीटीई) यांना निलंबित केले असून संपूर्ण प्रकरणाची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये फर्स्ट एसी कोचमधील एका केबिनची आकर्षक सजावट दिसून येते. संपूर्ण बर्थ रंगीबेरंगी फुगे, ताजी फुले, पुष्पगुच्छ आणि लाल गुलाबाच्या पाकळ्यांनी सजवण्यात आली होती. बर्थवर गुलाबाच्या पाकळ्यांपासून हृदयाची आकर्षक रचना करण्यात आली होती. त्यामुळे हा केबिन एखाद्या आलिशान 'हनीमून रुम'सारखा दिसत होता; मात्र या सजावटीतील सर्वात धोकादायक बाब म्हणजे केबिनमध्ये पेटत्या मेणबत्त्या ठेवण्यात आल्या होत्या. धावत्या रेल्वेत ज्वलनशील वस्तूंचा वापर केल्यामुळे आग लागण्याचा गंभीर धोका निर्माण होऊ शकला असता. त्यामुळे या प्रकाराकडे रेल्वे प्रशासनाने अत्यंत गंभीरतेने पाहिले आहे.



रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना 'नंदीग्राम एक्स्प्रेस' (गाडी क्रमांक ११००२ डाउन) मध्ये घडली. प्रवास करणाऱ्या एका नवविवाहित जोडप्याने आपला प्रवास संस्मरणीय करण्यासाठी ऑनलाइन माध्यमातून खासगी डेकोरेटरची सेवा घेतली होती. संबंधित डेकोरेटरने स्टेशनवरून रेल्वेच्या फर्स्ट एसी डब्यात प्रवेश करून संपूर्ण केबिन सजवली; मात्र यासाठी रेल्वे प्रशासन किंवा रेल्वे सुरक्षा यंत्रणेची कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आली नव्हती. परवानगीशिवाय बाहेरील व्यक्तीचा एसी डब्यात प्रवेश आणि ज्वलनशील मेणबत्त्यांचा वापर ही सुरक्षा नियमांची गंभीर पायमल्ली असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रकरण 'सोशल मीडिया'वर चर्चेत आल्यानंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने चौकशी सुरु केली. प्राथमिक तपासात ड्युटीवरील ट्रेन तिकीट परीक्षकाकडून निष्काळजीपणा झाल्याचे समोर आल्यानंतर संबंधित 'टीटीई'ला तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. तसेच, परवानगीशिवाय डेकोरेटरला डब्यात प्रवेश कसा मिळाला, याची सखोल विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

# परिवहन अधिकारी कोट्यधीश!

आग्रा येथे पाच वर्षे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (एआरटीओ) (प्रवर्तन) म्हणून कार्यरत असलेले निवृत्त अधिकारी ललित कुमार यांच्या लखनऊ येथील निवासस्थानी विजिलन्स विभागाने टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात बेहिशेबी मालमत्ता आढळून आली. या कारवाईत १.६२ कोटी रुपयांची रोकड, सुमारे २२ किलो सोने-चांदीची बिस्किटे आणि दागिने, तसेच कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. ललित कुमार यांनी ऑक्टोबर २०२० ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आग्रा येथे एआरटीओ (प्रवर्तन) म्हणून काम केले.



त्याआधी ते कानपूर येथे प्रादेशिक परिवहन निरीक्षक (आरआय) म्हणून कार्यरत होते. आग्रा येथील सेवाकाळात वाहन तपासणीदरम्यान चालकांशी वाद, कथित अवैध वसुलीचे आरोप, टोल प्लाझावरील वाद आणि इतर अनेक तक्रारींमुळे ते वारंवार चर्चेत राहिले. परिवहन विभागाकडे त्यांच्या विरोधात अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या; मात्र कोणत्याही प्रकरणात ठोस कारवाई झाल्याचे समोर आले नव्हते.

विजिलन्सच्या पथकाने लखनऊ येथील निवासस्थानी झडती घेतली असता अनेक लॉकर आढळून आले. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, सोन्या-चांदीची बिस्किटे आणि दागिने सापडले. घराच्या विविध ठिकाणी पॅकेटमध्ये लपवून ठेवलेली तब्बल १.६२ कोटी रुपयांची रोकडही जप्त करण्यात आली. सरकारमान्य मूल्यांकन तज्ज्ञांकडून तपासणी केल्यानंतर जप्त करण्यात आलेल्या सुमारे २२ किलो सोन्या-चांदीची बिस्किटे आणि दागिन्यांची किंमत २० कोटी रुपयांहून अधिक असल्याचे प्राथमिक अंदाजात समोर आले आहे. झडतीदरम्यान विविध स्थावर मालमत्तांमध्ये केलेल्या गुंतवणुकीची कागदपत्रेही सापडली असून त्यांची किंमत १३ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. टोयोटा इनोव्हा आणि ह्युंदाई आय-२० या कार, परवानाधारक रिव्हॉल्व्हर, विविध बँका, पोस्ट ऑफिस, म्युच्युअल फंड आणि मुदतठेवींमध्ये एक कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीचे पुरावेही तपास यंत्रणेला मिळाले आहेत. घराच्या आलिशान सजावटीवर आणि महागड्या गृहउपकरणांवरही मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आल्याचे तपासात दिसून आले.

# सेवाभावातून उभे राहिलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल हे रुग्णसेवेचे आदर्श मॉडेल

**पेमराज बोथरा यांचे प्रतिपादन; आचार्य श्री आनंदऋषीजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध आरोग्य शिबिरांना प्रारंभ**



आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जनरल सर्जरी शिबिराचे उद्घाटन करताना बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष तथा उद्योजक पेमराज बोथरा व मान्यवर.

नगर – राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने उभे राहिलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल हे केवळ उपचार करणारे रुग्णालय नसून सेवाभाव, विश्वास आणि सामाजिक बांधिलकी यांचे जिवंत प्रतीक बनले आहे. सर्वसामान्य रुग्णांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देत हे हॉस्पिटल आज रुग्णसेवेचे आदर्श मॉडेल ठरले असल्याचे गौरवोद्गार बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष तथा उद्योजक पेमराज बोथरा यांनी काढले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त स्व. सौ. जतनबाई मानकचंदजी बोथरा यांच्या स्मरणार्थ बोथरा परिवार (पारस ग्रुप) यांच्या सहकार्याने आयोजित जनरल सर्जरी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून जयंतीनिमित्त आयोजित विविध आरोग्य शिबिरांना औपचारिक प्रारंभ झाला.

यावेळी संतोष बोथरा, सतीश बोथरा, मनीषा बोथरा, संगीता बोथरा, प्रतिभा बोथरा, प्रनेश बोथरा, रोनक बोथरा, गौरव बोथरा, रोहन बोथरा, प्रसन्ना बोथरा, प्रणित बोथरा, खुशक बोथरा, समीक्षा बोथरा, श्रेया बोथरा, दर्शना बोथरा, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, माणकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, निखीलेंद्र लोढा, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, जनरल सर्जन डॉ. भास्कर जाधव, डॉ. महेश घुगे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात निखीलेंद्र लोढा यांनी बोथरा परिवाराच्या सामाजिक कार्याचा आढावा घेताना सांगितले की, उद्योग क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करतानाच बोथरा परिवाराने तन, मन आणि धनाने आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात मोलाचे योगदान दिले आहे. हॉस्पिटलच्या उभारणीपासून ते विस्तारापर्यंत, घरकुल योजना, २५ व्हिजन सेंटरची स्थापना आणि सावेडी येथील नव्या बहुविशेषता रुग्णालयाच्या उभारणीतही या परिवाराचा मोठा सहभाग आहे. मानकचंदजी बोथरा यांनी दिलेला समाजसेवेचा वारसा नवीन पिढी समर्थपणे पुढे नेत असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. वसंत कटारिया यांनी बोथरा परिवाराच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक करताना सांगितले की, आर्थिक मदत करणारे अनेक असतात; मात्र स्वतःचा वेळ देऊन कार्य करणारे फार कमी असतात. बोथरा परिवाराने रुग्णसेवेला आपले ध्येय मानून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.

प्रणित बोथरा यांनी सांगितले की, स्वतःच्या प्रगतीबरोबर समाजाचीही प्रगती झाली पाहिजे, हा आजोबा मानकचंदजी बोथरा यांचा संस्कार आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्याच विचारातून नवीन पिढी सामाजिक उत्तरदायित्वाची परंपरा पुढे नेत आहे.

जनरल सर्जन डॉ. भास्कर जाधव यांनी सांगितले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या रुग्णसेवेला यंदा २५ वर्षे पूर्ण होत असून, वर्षभर विविध आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून हजारो गरजू रुग्णांना लाभ मिळतो. अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा, सवलतीच्या दरातील तपासण्या आणि परवडणाऱ्या शस्त्रक्रिया ही या संस्थेची वैशिष्ट्ये आहेत. या जनरल सर्जरी शिबिरात ११० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. अपेंडिक्स, इन्व्हायनल हर्निया, हायड्रोसिल आदी शस्त्रक्रिया गरजू रुग्णांसाठी सवलतीच्या दरात करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले, तर प्रकाश छल्लाणी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## गुरुवाणी – १०

### भक्तीत शक्तीचे जागरण हवे



'अनुशासन' म्हटले की सगळ्यांच्या डोळ्यासमोर शिस्त येते. तीर्थंकरांच्या दृष्टीने अनुशासन म्हणजे, 'इलाज मिळणं व आजारपण दूर होणे'. हुकुमशाही म्हणजे अनुशासन नव्हे. घोड्याला पळविण्यासाठी चाबूक लागतो. हत्तीला चालवण्यासाठी अंकुश लागतो. पण अंकुश व्यवस्थित चालवता आला तरच हत्तीला वश करता येते. आज आईवडिलांच्या हातात मुलांचा अंकुश आहे, पण तो चालवण्याचे ज्ञानच नाही. परिणामी मुलं निरंकुश होतात. पूज्य रत्नऋषीजी महाराजांकडे अंकुश चालवण्याची कला होती आणि गुरूदेव हत्ती होते. त्यांनी अनुशासन कृपेच्या रूपाने स्विकारले. मुलांसाठी आईवडील शत्रू नसतात, पण त्यांचे अनुशासन मुलांना आवडत नाही. अनुशासनामागील त्यांची प्रेमळ भावना समजून घेतली पाहिजे. गुरूदेव गुरू आज्ञा पालन करायचे पण त्यांचा चेहरा दुःखी असायचा. याची सगळीकडे चर्चा व्हायची. ही गोष्ट पूज्य रत्नऋषीजी महाराज यांच्या गुरू भगिनी महासतीजी रामकंवरजी म.सा. यांच्या पर्यंत पोहोचली. त्यांना दिसले की, ऋषी आनंद सर्व काही मिळत असूनही कंगाल आहे. त्यांनी लहानग्या ऋषी आनंद यांना विचारले, तुमच्यामुळे तुमच्या गुरूंची बदनामी होत असेल तर तुम्हाला चालेल का? ऋषी आनंद यांनी उत्तर दिले, नाही!. पण मी असे काय केले? महासतीजींनी सर्व कथन केले की, 'तुमचा चेहरा उतरलेला असतो. असेच चालू राहिले तर तुम्हाला पुढच्या जन्मी गुरू प्राप्ती होणार नाही'. ऋषी आनंद यांनी त्यादिवशी दृढ संकल्प केला, 'माझा चेहरा कधी पडलेला दिसणार नाही'!. नंतर आयुष्यात अनेक वादळे आली, पण गुरूदेवांच्या चेहऱ्यावर कायम करूणा, वात्सल्य दिसले. १९७७ मधील घटना आहे, उन्हाळ्याचे दिवस होते. वडाळा येथे गुरूदेवांचा विहार होता. गरमी असल्याने त्यांचे आसन हवा वाहत असलेल्या ठिकाणी लावायचे अशी विनंती केली. त्यांनी शांतपणे सांगितले, 'माझं आसन इथेच राहील'. मी गुरूदेवांना पुन्हा आग्रह केला. त्यांनी उत्तर दिले, मर्द वोही है जो हर हाल में खुश रहे. म्हणूनच तपस्या कठिण असली तरी चेहरा दुःखी होऊ देऊ नका. चेहऱ्यावर स्मितहास्य ठेवा. परिस्थिती कशीही असो, गुरूदेवांचे नामस्मरण करत रहा. भक्तीत शक्तीचे जागरण हवे. भक्त कभी कमजोर नहीं होता, और जो कमजोर होता है वो भक्त नही होता.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# पोलीस काढणार ६ ऑगस्ट रोजी 'अंमली पदार्थविरोधी जनजागृती रॅली'

नगर – तरुण पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यातून वाचविणे, व्यसनमुक्त समाज घडविणे आणि अहिल्यानगर जिल्हा ड्रग्जमुक्त करण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने ६ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता भव्य अंमली पदार्थविरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही रॅली जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, अहिल्यानगर शहर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस मुख्यालयातून सुरू होणार आहे. या जनजागृती रॅलीत शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी, वकील, पत्रकार, लोकप्रतिनिधी, डॉक्टर, शांतता समितीचे सदस्य, विविध धर्मगुरू, सायकलिंग संघटना, क्रीडा संस्था, समाजसेवी संघटना तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाने केले आहे.

अंमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला आळा घालण्यासाठी सम ाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन जनजागृती करणे ही काळाची गरज असल्याचे पोलीस प्रशासनाने नमूद केले असून, या अभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून जिल्हा व्यसनमुक्त करण्याच्या चळवळीत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी प्रथम वर्ष परीक्षेचा ९९.२१ टक्के निकाल

नगर – विळद घाट येथील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी प्रथम वर्ष परीक्षेचा निकाल ९९.२१ टक्के लागला आहे. या परीक्षेत ६३० विद्यार्थ्यांपैकी ६२५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या निकालातील विशेष बाब म्हणजे २७६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह यश मिळविले असून, ३७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, तर उर्वरित विद्यार्थ्यांनी उच्च द्वितीय व द्वितीय श्रेणीत यश संपादन केले आहे. केवळ ५ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. अनुपस्थित विद्यार्थ्यांची संख्या शून्य आहे. महाविद्यालयातील सातत्यपूर्ण शैक्षणिक नियोजन, नियमित मार्गदर्शन, गुणवत्तापूर्ण अध्यापनामुळे निकालाची उत्कृष्ट परंपरा कायम राहिली.

या निकालाबाबत फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, आजचा उत्कृष्ट निकाल हा केवळ आकड्यांचा विजय नसून गुणवत्ता, शिस्त, कठोर परिश्रम आणि उत्कृष्ट शैक्षणिक संस्कृतीचा विजय आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची निवड करताना केवळ जाहिराती किंवा बाह्य आकर्षण न पाहता, विद्यापीठाचा निकाल, अनुभवी प्राध्यापक, संशोधन, नवोपक्रम आणि प्लेसमेंट यासारख्या वस्तुनिष्ठ निकषांचा विचार केला. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे, उद्योगाभिमुख आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. या यशाबद्दल विद्यार्थी, पालक, प्राचार्य, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# ठाकरे शिवसेनेच्या वतीने स्व. अनिलभैय्या राठोड यांना अभिवादन



ठाकरे शिवसेना पक्ष कार्यालयात स्व.अनिलभैय्या राठोड यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

नगर – अहिल्यानगर शहरातील तळागाळातील सर्वसामान्य माणसाच्या गळ्यातली ताईत असणारे स्व. अनिलभैय्या राठोड यांच्या पुण्यतिथी निम्मित चितळे रोड येथील शिवालयात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी महानगर प्रमुख किरण काळे यांच्यासह विक्रम राठोड, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, उपशहर प्रमुख सुनील भोसले जिग्नेश जग्गड, शुभम मिरांडे आदींसह पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी शिवसैनिकांनी स्व. राठोड यांच्या आठवणींना उजाळा दिला. काळे म्हणाले, स्व. अनिलभैय्या आज हयात नाहीत. मात्र आजही ते आपल्यात आहेत अशी अनुभूती कायम सामान्य माणसांना मिळत असते. सर्वसामान्यांच्या हिताच्या रक्षणासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. स्व. अनिलभैय्या यांच्या नसण्याची उणीव समस्त नगरकारांच्या मनाला आजही अस्वस्थ करणारी आहे. शिवसेना ही स्व. अनिलभैय्या यांनी दाखवलेल्या सर्वसामान्य जनतेसाठी काम करण्याच्या विचारांवर कायम काम करीत राहील. सर्वसामान्य माणसाने रात्री अपरात्री केव्हाही अनिलभैयांना फोन केला तरी त्यांच्या मदतीला ते तत्परतेने धावून जायचे. आपण फोन केला तर तो फोन उचलला जाईल आणि भैय्या लगेच उपस्थित होतील असा विश्वास सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये होता. अनिलभैय्या आपल्यात नसण्याची आजही एक पोरकेपणाची भावना नगरकरांच्या मनामध्ये आहे. अनिलभैय्या शरीराने जरी आपल्यात नसले तरी त्यांचे विचार जिवंत राहण्याची गरज आहे. म्हणूनच शहरातील ठाकरे शिवसेना त्यांच्या विचारांवर काम करीत असून कायम या विचारांची जपणूक करण्यासाठी कटिबद्ध राहील, अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

# रोटरी क्लब डिग्निटीचा पदग्रहण समारंभ उत्साहात संपन्न



रोटरी क्लब ऑफ अहमदनगर डिग्निटीचे अध्यक्ष अ‍ॅड. अभिषेक भगत व सचिव डॉ. वैशाली पाटील यांनी रोटरी क्लबचे प्रांतपाल जयेश पटेल व आ. प्राजक्त तनपुरे यांच्या हस्ते चार्टर स्वीकारून पदभार घेतला.

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर डिग्निटीच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर डिग्निटीचे नूतन अध्यक्ष अ‍ॅड. अभिषेक भगत व सचिव डॉ. वैशाली पाटील यांनी रोटरी क्लबचे प्रांतपाल जयेश पटेल यांच्या हस्ते चार्टर स्वीकारून पदभार घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. प्राजक्त तनपुरे हे होते. यावेळी क्लबचे आगामी प्रांतपाल क्षितिज झावरे, मावळते अध्यक्ष डॉ. सोनल भालसिंग, सहाय्यक प्रांतपाल मीनल बोरा, पुण्याचे गजानन शास्त्री महाराज आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक, शहरातील इतर रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. आ. प्राजक्त तनपुरे यांचा या कार्यकमात विशेष सन्मान करून त्यांना क्लबचे मानद सदस्यत्व बहाल करण्यात आले.

यावेळी बोलताना आ. तनपुरे म्हणाले, शैक्षणिक, पर्यावरण, आरोग्य अशा सर्वच क्षेत्रांमध्ये रोटरीने केलेले सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे. गरजूंना सोयीसुविधा उपलब्धतेसाठी पुढाकार घेत आहे. या नि:स्वार्थ व पारदर्शक कामाने वेगळा ठसा उमटवला आहे. ग्रामीण भागातील भारत घडविण्यासाठी रोटरी क्लबने पुढाकार घेत शिक्षण व आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे राबवाव्यात. या सामाजिक कामास जी काही मदत लागेल ती देण्यास मी तयार आहे. नगरच्या रोटरी क्लब डिग्निटीचे नूतन पदाधिकारी निश्चीतच सामजिक कार्य वाढवतील, असा विश्वास आ. तनपुरे यांनी व्यक्त केला.

प्रांतपाल जयेश पटेल म्हणाले, प्लास्टिकचे रिसायकल करून बेंचेस बनवण्याचे काम हाती घेतले असून यासाठी रोटरीचे सर्व सदस्य ३ महिने मोठ्या प्रमाणात प्लास्टिक गोळा करणार आहेत. तसेच नेत्रदान व रक्तदान चळवळ, रोटरी आदिशक्ती उपक्रमाद्वारे महिला सक्ष्मीकरण, व्यसनमुक्ती, डिजीटल क्लासरूम, पाणी हार्वेस्टिंग व खत निर्मिती असे अनेक प्रकल्प यावर्षी हाती घेतले आहेत. थॅलेसीमिया आजार बाबत जनजागृती व उपचार यावर विशेष भर देत आहोत, असे ते म्हणाले.

प्रास्ताविकात अ‍ॅड. अभिषेक भगत यांनी वर्षभरात राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. रोटरी क्लबने जे उद्दिष्ट दिले आहे ते पूर्ण करण्या बरोबरच डिग्निटी क्लबच्या माध्यमातून वृक्षारोपण, नशामुक्ती अभियान, जागर युवकांचा याद्वारे वैचारिक परिवर्तनासाठी संत मंडळी, आयएस व आयपीएस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन त्यांना करणार आहोत. जिथे गरज आहे तेथे पोहोचणार आहे, असे ते म्हणाले.

आभार मानताना डॉ.वैशाली पाटील यांनी क्लबच्या कार्यात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. क्लबचे मावळते अध्यक्ष डॉ.सोनल भालसिंग यांनी कार्यकाळातील विविध सामाजिक उपक्रमांचा लेखाजोखा मांडला. प्रा. रविंद्र चोभे, उज्वला राजे यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. सूत्रसंचालन अ‍ॅड.अभय राजे व डॉ. अजिता चोभे यांनी केले.

# राजर्षी शाहू महाराज समाजरत्न पुरस्काराने अहिल्यानगर येथील अल्ताफ सय्यद यांचा गौरव



नगर – समाजात माणुसकी, ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश देत गेली दोन दशके निस्वार्थ सामाजिक कार्य करणारे मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांना श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आषाढी एकादशी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून निमगाव वाघा (ता. नगर) येथे आयोजित करण्यात आलेल्या ङ्गजगतगुरू संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात सय्यद यांना मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी उद्योजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर, स्वागताध्यक्ष अ‍ॅड. आनंद सूर्यवंशी, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते अशोक सूर्यवंशी, अनिताताई खरात, विशेष सरकारी वकील अ‍ॅड. सुरेश लगड यांच्यासह साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अल्ताफ सय्यद हे गेल्या २० वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असून, समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहेत. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात त्यांनी केलेल्या सेवाकार्याची मोठी दखल घेण्यात आली होती. संकटाच्या कठीण काळात अनेक कुटुंबांपर्यंत अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू आणि आर्थिक मदत पोहोचवून त्यांनी हजारो नागरिकांना आधार दिला.

संस्थेच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शैक्षणिक मदत, शालेय साहित्य वाटप, मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जातात. त्यांच्या या कार्याची दखल घेत श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने सय्यद यांना राजर्षी शाहू महाराज समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# दिव्यांगांसाठी जिल्हा रुग्णालयात माहिती फलक उभारावेत

**भाजप दिव्यांग आघाडीचे जिल्हा शल्यचिकित्सकांना निवेदन**



जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घागरे यांना निवेदन निवेदन देताना वसंत शिंदे व इतर.

नगर – जिल्हा रुग्णालयात ऑनलाइन दिव्यांग प्रमाणपत्र (यूडीआयडी) प्रक्रियेसाठी दर महिन्याच्या प्रत्येक बुधवारी जिल्ह्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने दिव्यांग नागरिक व त्यांचे नातेवाईक येत असतात. रुग्णालय प्रशासनाने केस पेपर काढण्याची व्यवस्था समाधानकारक केली असली तरी त्यानंतर विविध विभाग, कक्ष क्रमांक आणि तपासणी प्रक्रियेची स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने दिव्यांगांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून देत भारतीय जनता पक्ष दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घागरे यांना निवेदन सादर केले.

निवेदनात रुग्णालयाच्या दर्शनी भागात कायमस्वरूपी माहिती फलक उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. या फलकावर २१ प्रकारच्या दिव्यांगांसाठी कोणत्या कक्षात तपासणी होते, संबंधित कक्ष क्रमांक, तपासणीची वेळ, आवश्यक कागदपत्रे तसेच ऑनलाइन प्रमाणपत्र तयार झाल्यानंतर आधार लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर संदेश प्राप्त झाल्यावरच प्रमाणपत्र घेण्यासाठी यावे, अशी स्पष्ट सूचना नमूद करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे दिव्यांग नागरिक व त्यांच्या नातेवाईकांच्या अनावश्यक फेऱ्या थांबून वेळ, पैसा आणि मानसिक त्रासाची बचत होईल, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घागरे यांनी निवेदनाची दखल घेत दिव्यांगांच्या अडचणींबाबत सकारात्मक चर्चा केली. रुग्णालयात येणाऱ्या दिव्यांग नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी दर्शनी भागात सविस्तर माहिती फलक उभारण्याची मागणी रास्त असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या संदर्भातील आवश्यक कार्यवाही करून येत्या दोन दिवसांत माहिती फलक लावण्यात येईल, असे आश्वासनही डॉ. घागरे यांनी शिष्टमंडळाला दिले. त्यांच्या या सकारात्मक भूमिकेबद्दल दिव्यांग विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

निवेदनावर भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे, महिला जिल्हाध्यक्ष आशाताई गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष ईश्वर गुंड, चंद्रकांत काळे, नगर तालुकाध्यक्ष श्रीकांत काळे, नगर शहराध्यक्ष विजय पडोळे, सचिव महेश विभूते तसेच जिल्ह्यातील दिव्यांग बांधव व पदाधिकाऱ्यांच्या वतीने स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या मागण्यांवर प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन दिव्यांगांसाठी अधिक सुलभ व पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त अहिल्यानगर येथील सस्मित आधार चित्पावन मंडळातर्फे इमारत कंपनी, कापडबाजार येथे एकत्र जमून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी चित्पावन मंडळातील अनेक जेष्ठ नागरिक, सभासद वर्ग तसेच अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य सहकुटुंब उपस्थित होते.

# सेंट्रल बँकेच्यावतीने उद्योजकांसाठी एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रम



नरेशकुमार दुबे (क्षेत्रीय प्रबंधक)

नगर – सेंट्रल बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय अहिल्यानगर यांच्या वतीने ७ ऑगस्ट रोजी एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने बँकेचे क्षेत्रीय प्रमुख नरेशकुमार दुबे यांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन दोन ठिकाणी करण्यात आले आहे. दुपारी ४ वाजता नागापूर एमआयडीसी येथील आमी हॉल येथे तसेच त्याच दिवशी दुपारी ४ वाजता पारनेर तालुक्यातील सुपा एमआयडीसी येथील कुणाल पॅलेस येथे हा कार्यक्रम होणार आहे. एमएसएमई क्षेत्रातील उद्योजकांना उद्योग विस्तार, नवीन प्रकल्प, यंत्रसामग्री खरेदी, कार्यभांडवल तसेच विविध बँकिंग योजनांची माहिती आणि कर्जसुविधांबाबत मार्गदर्शन या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे. पात्र उद्योजकांना बँकेच्या विविध कर्ज योजनांची माहिती देऊन त्यांना आर्थिक बळ देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमास उद्योजक, व्यावसायिक तसेच इच्छुक नागरिकांनी राहावे, असे आवाहन क्षेत्रीय प्रमुख नरेशकुमार दुबे यांनी केले आहे.

